मार्गदर्शक सुचना

१०४/५९१२

जा.क्र.कृआ-२०२०/./फलो-४/ प्रमंकृसियो मा.सु /२०२१
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००५,
दिनांक - 12 फेब्रुवारी २०२१

प्रति,

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी , (सर्व)**

**विषय : प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत (PMKSY) केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना सन २०२०-२१ मध्ये राबविण्यासाठी मार्गदर्शक सुचना निर्गमित करणेबाबत....**

**संदर्भ :** १) कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभाग भारत सरकार यांचे पत्र क्र.११- १४२/२०१५-हॉर्ट, कृषि भवन नवी दिल्ली,दि.२५ ऑगस्ट,२०१७

२) शासन निर्णय क्रमांक प्रकृसिं-०११९/प्र.क्र.४१/१४-अे,कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई दि.३० ऑगस्ट, २०१९

३) शासन निर्णय क्रमांक प्रकृसे-०५२०/प्र.क्र.५८/१४-अे, कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई दि.२१/१०/२०२०

४) शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-०९१९/प्र.क्र.२२१/१४-अे, कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई दि. ४/११/२०२०

५) शासन पत्र क्र.प्रकृसि-०५२०/प्रक्र.५८/१४-अे कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई दिनांक ०७/१२/२०२०

उपरोक्त संदर्भ क्र.१ वरील पत्राव्दारे प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना - प्रती थेंब अधिक पीक (**Per Drop More Crop**) केंद्र पुरस्कृत सूक्ष्म सिंचन योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाने कार्यात्मक मार्गदर्शक सूचना (Operational Guidelines) निर्गमित केलेल्या आहेत. (सदर सुचना http://pmksy.gov.in/ micro irrigation/ Guideline.aspx संकेतस्थळावर उपलब्ध आहेत).

संदर्भ क्र.३ चे शासन निर्णयान्वये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना प्रति थेंब - अधिक पिक (सुक्ष्म सिंचन योजना) राज्यात सन २०२०-२१ मध्ये राबविण्यासाठी केंद्र हिस्सा रु. ३१०.८३ कोटी व त्यास समरुप राज्य हिस्सा रु. २०७.२२ कोटी अशा एकुण रु.५१८.०५ कोटी निधीच्या कार्यक्रमास राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

संदर्भ क्र.५ चे शासनपत्रानुसार प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना प्रति थेंब अधिक पिक घटकांतर्गत सन २०२०-२१ करीता आतापर्यंत आयुक्तालयास उपलब्ध झालेल्या तसेच यापुढे उपलब्ध होणा-या निधीतुन (रु.५१८.०५ कोटी प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत) प्रथम सन २०१९-२० या वर्षात पुर्वसंमती प्राप्त सुक्ष्म सिंचन संच बसवुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या लाभार्थ्यांना प्राधान्याने निधी वितरीत करावा व तदनंतर महाडीबीटी पोर्टल वर प्राप्त अर्जांना पुर्वसंमती देऊन अर्ज निकाली काढण्याच्या सुचना आहेत .

केंद्र शासनास सादर करण्यात आलेला वार्षीक कृती आराखडा अधिक माहितीसाठी सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे. संदर्भ क्र.१ ते ५ मध्ये नमूद शासन निर्णय/परिपत्रकातील मार्गदर्शक सुचनांनुसार योजनेची सन २०२०-२१ मध्ये अंमलबजावणी करावयाची आहे. संदर्भ क्र. ४ चे शासनपरीपत्रकान्वये सन २०२०-२१ पासुन कृषि विभागाच्या प्रमुख योजनांची अंमलबजावणी महाडीबीटी पोर्टलद्वारे करण्यात येत असुन या पोर्टलमध्ये प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना प्रती थेंब अधिक पिक योजनेचा समावेश आहे. या योजनेच्या अंमलबजावणीचे अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत सुचना पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहेत.

## १. अर्जदारांची नोंदणी व आधार प्रमाणीकरण:

सर्व इच्छुक शेतकऱ्यांना महा-डीबीटी पोर्टलच्या संकेतस्थळावर जाऊन स्वतःची नोंदणी करावी लागेल आणि आपल्या आधार क्रमांकाचे प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे तथापि, सदर प्रक्रिया शेतकऱ्यांना एकदाच करावी लागणार आहे.

**१.१ संकेतस्थळ-** महा-डीबीटी पोर्टलचे https://mahadbtmahait.gov.in/ हे संकेतस्थळ आहे. या संकेतस्थळावरील **"शेतकरी योजना"** हा पर्याय निवडावा. शेतकरी स्वतःच्या मोबाईल, संगणक / लॅपटॉप / टॅबलेट, सामुदायिक सेवा केंद्र (CSC), ग्रामपंचायतीतील संग्राम केंद्र इ. माध्यमातून उक्त संकेतस्थळावर जाऊन अर्ज करू शकतील.

**१.२ अर्जदार नोंदणी-** अर्जदारांनी प्रथमतः वापरकर्त्याचे नाव (User name) व संकेतशब्द (Password) तयार करून घ्यावा व आपले खाते उघडावे (लॉगीन). तदनंतर पुन्हा लॉगीन करावे, अर्जदारांना वैयक्तिक लाभार्थी अथवा शेतकरी गट / एफ.पी.ओ./संस्था म्हणून नोंदणी करण्याचा पर्याय उपलब्ध असेल. अर्जदारांनी त्यांच्या इच्छेनुसार योग्य पर्याय निवडावा. महा-डीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याबाबत सविस्तर माहिती User manual द्वारे दिली असून ते पोर्टलवर माहितीस्तव ठेवण्यात आलेले आहे.

**१.३ आधार क्रमांक प्रमाणीकरण-** वैयक्तिक लाभार्थी म्हणून नोंदणी करू इच्छिणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना त्यांचा आधार क्रमांक सदर संकेतस्थळावर प्रमाणित करून घ्यावा लागेल. ज्या वापरकर्त्याकडे आधार क्रमांक नसेल त्यांनी प्रथम आधार नोंदणी केंद्राकडे जाऊन त्यांची नोंदणी करावी. सदर नोंदणी क्रमांक महा-डीबीटी पोर्टलमध्ये नमूद करून त्यांना या योजनेसाठी अर्ज करता येईल. अशा अर्जदारांना अनुदान वितरीत करण्यापूर्वी महा-डीबीटी पोर्टलमध्ये त्यांना देण्यात येणारा आधार क्रमांक नोंदणीकृत करून प्रमाणित करून घ्यावा लागेल, त्याशिवाय त्यांना अनुदानाचे वितरण करण्यात येणार नाही

**१.४ वैयक्तिक तपशील / गटाची माहिती (Profile) भरणे:**

वैयक्तिक लाभार्थी म्हणून नोंदणी केलेल्या सर्व शेतकऱ्यांना प्रथमतः त्यांचा वैयक्तिक तपशील भरणे बंधनकारक आहे. या अंतर्गत अर्जदारांना वैयक्तिक माहिती, पत्ता व स्वतःच्या नावे असलेल्या शेत जमिनीचा तपशील सादर करावा लागेल. त्याचप्रमाणे योजनेच्या निकषानुसार पिकांचा तपशील, कुटुंबाचा तपशील, शेतावरील वीज उपलब्धता, सिंचन स्त्रोत इ. बाबींचा तपशील सादर करावा लागेल. या सदरामध्ये तारांकित (*) बाबींची माहिती देणे अनिवार्य असून सदर माहिती भरल्यानंतरच संबंधीत लाभार्थ्यांच्या वैयक्तिक तपशीलास अनुसरून ते विविध योजनांमधील ज्या बाबींना पात्र ठरत असतील त्या बाबींच्या निवडीसाठी त्यांना अर्ज करता येईल. त्याचप्रमाणे शेतकरी गट / एफ.पी.ओ. /संस्था म्हणून नोंदणी करण्याचा पर्याय निवडलेल्या अर्जदारांना त्यांच्या संस्थेची माहिती सादर करावी लागेल.

**१.५ कृषि विभागाच्या विविध बाबींना अर्ज करणे:**

कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गत अनेक बाबींकरिता अर्थसहाय्य करण्यात येते. या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना एका अर्जाद्वारे सर्व योजनांसाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी **सिंचन साधने व सुविधा** या घटकांतर्गत सुक्ष्म सिंचन (ठिबक व तुषार सिंचन), शेततळे, शेततळ्यास प्लास्टिक अस्तरीकरण, पाईप, पंपसेट, इंजिन इ. बाबी समाविष्ठ आहेत. तथापी प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना प्रती थेंब - अधिक पिक सुक्ष्म सिंचन या घटकांतर्गत सुक्ष्म सिंचन (ठिबक व तुषार सिंचन) या बाबीकरीता लाभ घेता येईल.

शेतकऱ्यांनी उपरोक्त प्रत्येक घटकांतर्गत उपलब्ध असलेल्या विविध बाबींपैकी आपल्या पसंतीच्या बाबींची निवड करून त्यांचा अर्जात समावेश करावयाचा आहे. अशाप्रकारे सर्व बाबींची निवड पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर करावयाचा आहे. उपरोक्त घटकांपैकी ज्या बाबी शेतकरी गट / एफ.पी.ओ. /संस्था यांना लागू असतील त्याकरिता ते अर्ज करू शकतील. महा-डीबीटी पोर्टलवर वैयक्तिक शेतकरी आणि शेतकरी गट / एफ.पी.ओ. /संस्था यांनी अर्ज सादर केल्यानंतर त्यावरील पुढील प्रक्रियेची कार्यपद्धती एकसमान असून त्याचा तपशील पुढील परिच्छेदांमध्ये नमूद केलेला आहे.

**१.६ अर्ज शुल्क:**

अर्ज सादर करतेवेळी शेतकऱ्यांनी रु. २०/- शुल्क व रु. ३.६०/- जी.एस.टी. मिळून एकूण रु.२३.६०/- शुल्क ऑनलाईन भरावयाचे आहे तदनंतर, महा-आयटी महामंडळाकडे शेतकऱ्यांचा अर्ज पुढील प्रक्रीयेकरिता

पाठविला जाईल. अर्ज सादर करण्याच्या अंतिम मुदतीपर्यंत शेतकऱ्यांना अर्जात निवडलेल्या बाबींमध्ये विना शुल्क बदल करता येतील (नवीन बाबींचा अर्जात समावेश करणे अथवा अर्जात समाविष्ट केलेल्या बाबी वगळणे) परंतु मुदत संपल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही.

अर्ज शुल्क भरणेकरीता खालीलपैकी एक पर्यायाद्वारे शुल्क भरणेची सुविधा आहे.

१.वालेट-मोबाईल ॲप पेटीएम

२.नेट बँकींग

३.क्रेडीट कार्ड/डेबीट कार्ड

४.IMPS-Immediate Payment Service- NEFT (Electronic Fund Transfer)

५. UPI Unified Payment Interface-Bheem Pay

## २. एकत्रित संगणकीय सोडत: तालुका कृषि अधिकारी

महा-डीबीटी पोर्टलवर कृषि विभागाने विकसित केलेल्या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांचा कोणत्याही विशिष्ट योजनेस अर्ज घेण्यात येत नसून तो शेती निगडीत विविध बाबींसाठी घेण्यात येत आहे. त्या बाबींकरिता कोणत्या योजनेतून लाभ देता येईल याबाबत संगणकीय प्रणाली एकत्रित सोडतीमध्ये निर्णय घेईल. महा-डीबीटी पोर्टलद्वारे कृषि विभागाच्या सर्व योजनांसाठी तालुका स्तरावर एकत्रित संगणकीय सोडत काढण्यात येणार आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता नसून त्यांनी अर्ज केलेल्या बाबी ज्या-ज्या योजनेतून उपलब्ध असतील त्या सर्व योजनांसाठी अर्जाचा विचार केला जाईल.

शेतकऱ्यांनी (वैयक्तिक शेतकरी व गट / FPOs) अर्ज केलेल्या विविध बाबींची तालुका स्तरावर एकत्रित संगणकीय सोडत काढण्यात येईल तथापि ज्या घटकांसाठी / प्रवर्गासाठी तालुका स्तरावर पुरेसा आर्थिक लक्षांक उपलब्ध होणार नाही त्यासाठी जिल्हा स्तरावर संगणकीय सोडत काढण्यात येईल.

संगणकीय सोडतीत निवड झालेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर लघु संदेशाद्वारे (SMS) त्यांच्या निवडीबाबत अवगत करण्यात येईल. सदर सोडतीमध्ये ज्या शेतकऱ्यांची निवड झाली नसेल त्यांना प्रतिक्षायादीत क्रमवारीनुसार ठेवण्यात येईल. शेतकऱ्यांचे अर्ज घटक / बाब निहाय घेण्यात येत असून संगणकीय सोडत प्रक्रीयेद्वारे शेतकऱ्यांना त्यांच्या अर्जातील बाबी विविध प्रचलित योजनेतून मंजूर करण्यात येतील.

## ३. कागदपत्रे सादर करणे: अर्जदार शेतकरी

संगणकीय सोडतीत निवड झालेल्या शेतकऱ्यांना (वैयक्तिक शेतकरी व गट / FPOs) त्यांची ज्या बाबीसाठी व ज्या योजनेंतर्गत निवड झाली असेल त्यासंबंधीची आवश्यक कागदपत्रे महा-डीबीटी पोर्टलवर सादर (Upload) करण्याबाबत त्यांच्या मोबाईल क्रमांकावर लघु संदेशाद्वारे (SMS) कळविण्यात येईल. शेतकऱ्यांनी सदर कागदपत्रे महा-डीबीटी पोर्टलवर विहित मुदतीत सादर (Upload) करावयाची आहेत, जे शेतकरी विहित मुदतीत कागदपत्रे सादर करणार नाहीत त्यांची निवड रद्द करण्यात येईल. ही प्रक्रीया पुर्णतः ऑनलाईन असल्यामुळे लघु संदेशाद्वारे मागविलेल्या कागदपत्रांशिवाय कोणत्याही इतर कागदपत्रांची शेतकऱ्यांकडे मागणी करण्यात येऊ नये.

<u>अनुदान प्रस्तावासाठी आवश्यक कागदपत्रे -</u>

१. ७/१२ उतारा ( मालकी हक्कासाठी)
२. ८ - अ उतारा (एकुण क्षेत्राच्या माहीतीसाठी )
३. शेतक-याचे हमीपत्र (विहीत नमुना सोबत परिशिष्ठ ७ मध्ये सहपत्रित केला आहे.)

४. सामाईक क्षेत्र असलेल्या लाभार्थी शेतकऱ्याने अनुदान मागणीसाठी अर्ज केला असल्यास, ते ज्या क्षेत्रामध्ये सुक्ष्म सिंचन संच बसविणार आहेत, त्या क्षेत्रामध्ये सुक्ष्म सिंचन संच बसविण्यास तसेच त्यांचे नावे अनुदान वर्ग करण्यास हरकत नसल्याबाबत इतर खातेदारांचे सहमती पत्र.

५. लाभार्थी अज्ञान असल्यास अनुदानाची रक्कम त्याच्या वतीने अज्ञान पालन कर्त्याच्या नावे देय राहील. तसेच स्वयंघोषणापत्र संबंधित अज्ञान लाभार्थी व पालक यांनी संयुक्तपणे प्रस्तावासोबत सादर करणे अनिवार्य राहील.

६. लाभार्थी/संस्था यांना शेतजमीन भाडेतत्वावर घेऊन सुक्ष्म सिंचन योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास, मालकी हक्क असेलला ७/१२, ८ अ आणि लाभार्थ्यांने अर्ज मंजुर झाल्याच्या दिनांकापासुन सात ते दहा वर्षासाठी शेतमालकासोबत केलेल्या कराराची प्रत.

७. संस्था/एफ पी ओ/ गटांनी अनुदान मागणीसाठी अर्ज केला असल्यास, संस्था प्रमुख/गट प्रमुख ज्या क्षेत्रामध्ये सुक्ष्म सिंचन संच बसविणार आहेत, त्या क्षेत्रामध्ये सुक्ष्म सिंचन संच बसविण्यास तसेच त्यांचे नावे अनुदान वर्ग करण्यास हरकत नसल्याबाबत इतर सदस्यांचे सहमती पत्र.

८. देयकाची मुळ प्रत (टॅक्स ईन्व्हाईस)

९. कंपनी प्रतिनिधीने तयार केलेला सुक्ष्म सिंचन संच आराखडा व प्रमाणपत्र (सहपत्रित परिशिष्ठ ६ प्रमाणे)

## ४. शेतकऱ्यांच्या अर्जाची/कागदपत्राची छाननी ,पुर्वसंमती प्रदान करणे

### ४.१ मंडळ कृषि अधिकारी

संगणकीय सोडतीत या योजनेंतर्गत शेतकऱ्यांची (वैयक्तिक शेतकरी व गट / FPOs) निवड झालेली असल्यास या योजनेकरीता निश्चित केलेल्या कागदपत्रांची व अर्जाची छाननी मंडळ कृषि अधिकारी यांचे स्तरावर करण्यात येईल. छाननी अंती पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना पुर्व-संमती देण्यासाठी तालुका कृषि अधिकारी यांचेकडे आनलाईन शिफारस करतील. तसेच ज्या शेतक-यांचे अर्ज/ कागदपत्रांची पुर्तता होत नसेल अशा शेतक-यांचे प्रस्ताव पुन्हा शेतक-यांच्या लाग ईन अकाऊंटमध्ये परत पाठवतील. तसेच कागदपत्रांची पुर्तता होणार नसल्याची खात्री झाल्यास / अर्ज करतांना चुकीची माहिती भरली असल्यास असे अर्ज मंडळ कृषि अधिकारी रद्द करतील. वरील प्रक्रीयेबाबत शेतकऱ्यांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर लघु संदेशाद्वारे (SMS) अवगत करण्यात येईल.

### ४.२ तालुका कृषि अधिकारी

मंडळ कृषि अधिकारी यांचेकडुन शिफारस झालेले प्रस्ताव प्राप्त झालेनंतर कागदपत्रांची व अर्जाची छाननी तालुका कृषि अधिकारी स्तरावर कार्यालयातील कृषि अधिकारी यांचेमार्फत करण्यात येईल. मात्र मात्र अंतिम जाबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहील. .छाननी करतांना मागील सात वर्षात पाच हेक्टर च्या मर्यादेत लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचे क्षेत्र पडताळणी करावी. त्यानुसार छाननी अंती पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना तालुका कृषि अधिकारी एकत्रित संगणकीय प्रणालीद्वारे पुर्व-संमती प्रदान करतील. पुर्वसंमती आदेश शेतकऱ्यांना त्यांच्या महा-डीबीटी पोर्टलवरील खात्यामध्ये (लॉगीन) उपलब्ध होतील. पुर्व-संमती आदेश मिळालेल्या शेतकऱ्यांपैकी जे शेतकरी त्यांना मंजूर केलेल्या बाबींची विहित कालावधीत अंमलबजावणी करणार नाहीत, त्यांची पुर्वसंमती रद्द करण्यात येईल व प्रतिक्षायादीतील क्रमवारीनुसार पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येईल व संबंधितांना त्याप्रमाणे अवगत करण्यात येईल.

तसेच ज्या शेतक-यांचे अर्ज/ कागदपत्रांची पुर्तता झाली नसेल अशा शेतक-यांचा प्रस्ताव मंडळ कृषि अधिकारी यांना पुन्हा छाननीसाठी परत पाठवतील. तसेच कागदपत्रांची पुर्तता होत नसल्याची त्यांची खात्री झाल्यास तालुका कृषि अधिकारी असे अर्ज रद्द करतील. वरील प्रक्रीयेबाबत शेतकऱ्यांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर लघु संदेशाद्वारे (SMS) अवगत करण्यात येईल.

# ५. सुक्ष्म सिंचन संच खरेदी करणे व देयक सादर करणे

## ५.१ अर्जदार शेतकरी

कृषि विभागाने पुर्व-संमती आदेशाद्वारे मंजूर केलेल्या घटकांची शेतकऱ्यांनी (वैयक्तिक शेतकरी व गट / FPOs ) ३० दिवसाच्या कालावधीत सुक्ष्म सिंचन संच उभारणी करणे बंधनकारक असेल. मंजूर केलेल्या बाबींपैकी ठिबक सिंचन संच व तुषार सिंचन संच या घटकांची खरेदी करावयाची असेल अथवा शेतावर उभारणी / स्थापना करावयाची असेल, त्या बाबींची शेतकऱ्यांनी कृषि आयुक्तालय स्तरावरील नोंदणीकृत उत्पादक कंपनीचे अधिनस्त जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयात नोंदणी झालेल्या वितरकाकडुन त्यांच्या पसंतीने सुक्ष्म सिंचन संच साहित्य खरेदी करावे.

विक्रेत्याने शेतकरी व कंपनी तांत्रिक प्रतिनिधीसमवेत स्थळ पाहणी करावी. शेतक-यांने दिलेला पाणी परिक्षण अहवाल, पाणी उपलब्धता, डिझेल/ विदयुत मोटीरीची क्षमता, मातीचा प्रकार, घ्यावयाचे पीक, जमीनीचा चढउतार, पाण्याच्या सुविधेपासुन प्रस्तावित ठिबक/तुषार सिंचन संचाचे अंतर इ. माहितीच्या आधारे व प्रत्यक्ष पाहाणी करुन कंपनी प्रतिनिधी यांनी आराखडा तयार करावा. शेतक-याने आराखड्याच्या आधारे वितरकाकडुन साहित्य घेऊन संचाची उभारणी करुन घ्यावी. ठिबक सिंचन संच व्यवस्थित चालण्याच्या दृष्टीने वरील आराखडा तांत्रिकदृष्टया योग्य आहे अशा कंपनी प्रतिनिधीची सही असलेल्या प्रमाणपत्रासह आराखडा शेतक-याने घ्यावा. तसेच वितरकाकडुन घेतलेल्या सुक्ष्म सिंचन साहित्याचे देयक कंपनी प्रतिनिधी यांच्या प्रतिस्वाक्षरीसह (जी.एस.टी. क्रमांकासह) छायांकित प्रत (Scan Copy) व आराखड्याची छायांकित प्रत महा-डीबीटी पोर्टलवर सादर (Upload) करावी. तसेच देयकाची एक प्रत शेतक-याने स्वत:जवळ जतन करावी.सदरची कार्यवाही पुर्वसंमती दिल्यानंतर ३० दिवसात पुर्ण करणे आवश्यक आहे.

सुक्ष्म सिंचन संच बसविण्यापुर्वी शेतक-याने त्यांच्या पसंतीनुसार निवडलेल्या उत्पादक कंपनी किंवा त्यांचे प्रतिनिधीबरोबर साध्या कागदावर करार करणे आवश्यक आहे. ( विहीत नमुना परिशिष्ठ १६ मध्ये सहपत्रित केले आहे.)

**पूर्वसंमती न घेता शेतकऱ्याने सूक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठीचा प्रस्ताव सादर केला असेल तर अशा शेतक-यांना अनुदान देण्याची जबाबदारी शासनाची असणार नाही.**

## ५.२ मंडळ कृषि अधिकारी

शेतकऱ्यांनी देयकाची प्रत महा-डीबीटी पोर्टलवर सादर (Upload) केल्यानंतर मंडळ कृषि अधिकारी, देयक व आराखडा यांची छाननी करतील. छाननी अंती पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांचे प्रस्ताव ऑनलाईन तालुका कृषि अधिकारी यांचे स्तरावर शिफारस करतील. ज्या शेतक-यांचे देयक, संच आराखड्यामध्ये त्रुटी आढळुन आल्यास, देयक अपलोड करतांना चुकीची माहिती भरल्यास असे अर्ज देयकासह संबंधीत शेतक-यांच्या लाग ईन अकाऊंटमध्ये पुर्ततेसाठी परत पाठवतील. ज्या अर्जाच्या त्रुटींची पुर्तता होऊ शकत नाही अशा अपात्र ठरलेल्या शेतक-यांचे प्रस्ताव मंडळ कृषि अधिकारी रद्द करतील. रद्द करण्यात आलेल्या प्रकरणांची यादी कारणासह कार्यालयात जतन करण्यात यावी. वरील प्रक्रीयेबाबत शेतकऱ्यांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर लघु संदेशाद्वारे (SMS) अवगत करण्यात येईल.

## ५.३ तालुका कृषि अधिकारी

मंडळ कृषि अधिकारी यांनी शिफारस केलेले अर्ज प्राप्त झालेनंतर निकषानुसार कागदपत्रांची व अर्जाची छाननी तालुका कृषि अधिकारी स्तरावर त्यांचे अधिनस्त कृषि अधिकारी आणि तांत्रिक कर्मचारी यांचेमार्फत करण्यात येईल. मात्र अंतिम जाबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहील. छाननी अंती पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांचे प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी त्यांचे अधिनस्त संबंधीत कृषि पर्यवेक्षक यांना पात्र अर्जाच्या मोका तपासणीसाठी आदेशित करतील. लाभार्थ्याच्या प्रस्तावाच्या दोन प्रिंट काढुन एक प्रत कार्यालयात जतन करुन दुसरी प्रत मोका तपासणीसाठी कृषि पर्यवेक्षक यांना उपलब्ध करुन देतील.

तसेच ज्या शेतक-यांचे अर्ज/ कागदपत्रांची पुर्तता झाली नसेल अशा शेतक-यांचे प्रस्ताव मंडळ कृषि अधिकारी यांना महाडीबीटी आज्ञावलीद्वारे पुन्हा छाननीसाठी परत पाठवतील. तसेच कागदपत्रांची पुर्तता होत नसल्याची त्यांची खात्री झाल्यास तालुका कृषि अधिकारी असे अर्ज रद्द करतील. वरील प्रक्रीयेबाबत शेतकऱ्यांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर लघु संदेशाद्वारे (SMS) अवगत करण्यात येईल. योग्यरीत्या छाननी न करता चुकीचा प्रस्ताव शिफारस केल्यास संबंधीत मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि अधिकारी आणि तालुका कृषि अधिकारी हे वैयक्तिकरीत्या जबाबदार राहतील.

## ६. मोका तपासणी व जिओटॅगिंग करणे -

### ६.१ कृषि पर्यवेक्षक

६.१.१ कृषि पर्यवेक्षकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील १०० टक्के प्रस्तावांची मोका तपासणी कृषि सहायक यांचे मदतीने करावयाची आहे.

६.१.२ सुक्ष्म सिंचन घटकाचे मोका-तपासणी नोंदी घेण्याचे कामकाज महाडीबीटी पोर्टल निगडीत मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे करण्याचे नियोजित असून ते विकसित झाल्यानंतर उपलब्ध करून दिले जाईल. मोबाईल ॲप वापराबाबतच्या सुचना स्वतंत्रपणे कळविण्यात येतील. तथापी तोपर्यंत ऑफलाईन पद्धतीने मोका तपासणी अहवाल नोंदवावा. (परिशिष्ठ २ व परिशिष्ठ ३ नुसार)

६.१.३ तालुका कृषि अधिकारी यांचेकडुन प्राप्त झालेले सुक्ष्म सिंचन संचाचे प्रस्तावानुसार कृषि पर्यवेक्षकांनी संबंधीत **कृषि सहायक यांचे मदतीने** मोबाईल ॲपव्दारे १० दिवसाच्या कालावधीत महा-डीबीटी पोर्टलवर दिलेल्या सुचनेनुसार मोका तपासणी अहवाल नोंदवावयाचा आहे.

६.१.४ कृषि पर्यवेक्षकांनी मोका तपासणी बरोबरच महाकृषि मोबाईल ॲपव्दारे प्राधान्याने भौगोलीक स्थानांकन (Geo tagging) लाभार्थीची नोंदणी करावी. तसेच शेतकरी / शेतकरी प्रतिनिधी समवेत संचाचे अक्षांश / रेखांश सह फोटो काढून सादर करणे अनिवार्य राहिल. महाकृषि मोबाईल ॲप सुरु होईपर्यंत केंद्र शासनाचे भुवन ॲपचा वापर करावा. परंतु भौगोलिक स्थानांकन करणे अनिवार्य आहे.

६.१.५ केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांमधील परिच्छेद ८.४ मध्ये नमुद केल्यानुसार Annexure-IV a ते Annexure- IV f, मध्ये ०.४ हेक्टर ते ५.०० हेक्टर क्षेत्रा पर्यंतच्या Indicative Bill of Quantities (An indicative list of system components required for installing a drip irrigation system) ठिबक सिंचन संचाकरीता तसेच Annexure- V ते Annexure- IX तुषार सिंचन संचा नुसार साहित्य तपासुन तांत्रिकदृष्ट्या खात्री करावी.

६.१.६ मोका तपासणी अहवाल मोबाईल ॲपद्वारे पुर्णपणे नोंदविलेनंतर सादर करुन मंडळ कृषि अधिकारी यांना छाननीकरीता महाडीबीटी आज्ञावलीमधुन शिफारस करावे. प्रत्यक्षात संच बसविलेले नसतांना अथवा अर्जातील क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्रावर संच बसविला असेल किंवा विहीत प्रमाणकापेक्षा जास्त अनुदानाची शिफारस केल्यास संबंधीत कृषि पर्यवेक्षक वसुलीस जबाबदार राहील.

### ६.२ मंडळ कृषि अधिकारी

कृषि पर्यवेक्षकांनी मोका तपासणी करुन महा-डीबीटी पोर्टलवर सादर केलेल्या सर्व प्रस्तावांची मंडळ कृषि अधिकारी यांनी मार्गदर्शक सुचनाप्रमाणे छानणी करावी. छाननी अंती पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांचे प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी स्तरावर शिफारस करावी. ज्या प्रस्तावाच्या मोका तपासणी अहवालामध्ये त्रुटी आढळुन आल्यास अथवा मोका तपासणी करतांना चुकीची माहिती भरली असल्यास असे प्रस्ताव संबंधीत कृषि पर्यवेक्षकांच्या लाग ईन अकाऊंटमध्ये पुनर्तपासणीसाठी परत पाठवतील. ज्या अर्जांची त्रूटी पुर्तता होऊ शकत नाही अशा अपात्र ठरलेल्या शेतक-यांचे प्रस्ताव मंडळ कृषि अधिकारी रद्द करतील. वरील प्रक्रीयेबाबत शेतकऱ्यांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर लघु संदेशाद्वारे (SMS) अवगत करण्यात येईल.

तसेच मंडळ कृषि अधिकारी यांनी ३० टक्के मापदंडाप्रमाणे क्षेत्रिय तपासणी करुन लेखी अहवाल तालुका कृषि अधिकारी कार्यालयास सादर करावा.

### ६.३ तालुका कृषि अधिकारी

मंडळ कृषि अधिकारी स्तरावरावरुन शिफारस झालेले प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मोका तपासणी अहवालाची छाननी तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि अधिकारी यांचेमार्फत करुन अनुदान परिगणना करावी. मात्र अंतिम जबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहील. तसेच ज्या शेतक-यांच्या मोका तपासणी अहवालांची पुर्तता होत नसेल अशा शेतक-यांचे प्रस्ताव मंडळ कृषि अधिकारी यांना पुन्हा छाननीसाठी परत पाठवतील. तसेच कागदपत्रांची पुर्तता होत नसल्याची त्यांची खात्री झाल्यास तालुका कृषि अधिकारी असे अर्ज आज्ञावलीद्वारे रद्द करतील. वरील प्रक्रीयेबाबत शेतकऱ्यांना त्यांच्या मोबाईल क्रमांकावर लघु संदेशाद्वारे (SMS) अवगत करण्यात येईल.

तसेच मंडळ कृषि अधिकारी स्तरावरुन विहीत मापदंडानुसार ३० टक्केप्रमाणे तपासणी झाल्याची खात्री करुन तसेच तपासणी अहवाल प्राप्त करुन प्रस्ताव तालुका कृषि अधिकारी यांनी अनुदानासाठी शिफारस करावेत. तालुका कृषि अधिकारी स्तरावरुन अंतिम अनुदान शिफारस होत असल्याने तालुका कृषि अधिकारी यांचेसह सर्व तांत्रिक अधिकारी कर्मचारी यांनी अधिक दक्ष राहुन पात्र लाभार्थीनाच अंतिम अनुदानाची शिफारस करण्यात यावी.

## ७. अनुदान परिगणना

### तालुका कृषि अधिकारी

छाननी अंती पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना तालुका कृषि अधिकारी आज्ञावलीद्वारे अनुदान परिगणना करतील. अनुदान परिगणना करतांना शेतक-यांच्या देयकाची रक्कम (जीएसटी रक्कम वगळुन), मोका तपासणी अहवालानुसार निश्चित झालेली रक्कम आणि मार्गदर्शक सुचनेतील मापदंडाप्रमाणे निश्चित झालेली रक्कम यापैकी सर्वात कमी आलेल्या रकमेनुसार अनुदान परिगणना करुन पात्र प्रस्ताव कृषि आयुक्तालय स्तरावर महाडीबीटी पोर्टलवर सादर करतील.

## ८.लाभार्थी शेतक-यांना अनुदान वितरण

### कृषि आयुक्तालय स्तर

सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन निर्णय क्र.GAD uमातंस-२०१८/CR १३८/S१/३९ दिनांक १२/१०/२०१८ अन्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार राज्य स्तरावरून (कृषि आयुक्तालय) केंद्रीय पद्धतीने लाभार्थी शेतकऱ्यांच्या आधार क्रमांकाच्या आधारे त्यांच्या बँक खात्यात अनुदानाची रक्कम जमा करण्यात येईल. सबब, अनुदान जमा करतेवेळी शेतकऱ्यांचा आधार क्रमांक त्यांच्या ज्या बँक खात्याशी संलग्न असेल त्याच खात्यावर अनुदानाची रक्कम जमा होईल.

तालुका कृषि अधिकारी यांचेकडून अनुदानाची परिगणना केलेले प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे शिफारशीसह अनुदान अदायगीसाठी सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय यांना महा-डीबीटी पोर्टलव्दारे शिफारशीसह सादर होईल. कृषि आयुक्तालय स्तरावरून योजनेचे देयक कोषागारास सादर करणे व कोषागाराने उपलब्ध करून दिलेल्या निधीचे लाभार्थ्यांना अनुदान वितरण करण्याची जबाबदारी सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, यांची राहील,

## ९. सर्वसाधारण सुचना

### ९.१ लघु संदेश (एस.एम.एस.) सुविधा:

लाभार्थी शेतकऱ्यांना अर्ज करतेवेळी तसेच अर्जावर पुढील कार्यवाही करण्याच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावर लघु संदेशाद्वारे वेळोवेळी अवगत करण्यात येईल.

### ९.२ तक्रार / सूचना:

शेतकऱ्यांना अर्ज करतेवेळी काही अडचणी येत असतील अथवा काही सूचना करावयाची असल्यास ते महा-डीबीटी पोर्टल वरील तक्रार / सुचना या बटनवर क्लिक करून आपल्या तक्रारीचा / सूचनेचा तपशील सादर करू शकतील. कृषि आयुक्तालय स्तरावरुन प्राप्त तक्रारी/सुचनांची दखल घेण्यात येईल.

### ९.३ कृषि विभागाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी महा-डीबीटी पोर्टलवरील सुविधा:

प्रथम टप्प्यात कृषि विभागाच्या १३ योजनांची महा-डीबीटी पोर्टलद्वारे अंमलबजावणी करण्यात येणार आहे आणि टप्प्या-टप्प्याने उर्वरित योजनांचा या पोर्टलवर समावेश करण्यात येणार आहे. अशाप्रकारे, यापुढे विविध योजनांच्या अंमलबजावणीचे कामकाज पूर्णतः ऑनलाईन करण्यात येणार आहे (अर्ज करण्यापासून लाभार्थ्यांना अनुदानाचा प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत), त्याकरिता कृषि विभागाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी पुढील सुविधा देण्यात आल्या आहेत.

### ९.४ कृषि विभागाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी लॉगीन आय. डी. व पासवर्ड:

विविध योजनांच्या अंमलबजावणीशी निगडीत असलेल्या कृषि विभागाच्या संबंधित क्षेत्रिय अधिकारी / कर्मचाऱ्यांना महा-डीबीटी पोर्टलवर योजनांच्या अंमलबजावणीचे कामकाज करण्याकरीता लॉगीन आय. डी. व पासवर्ड उपलब्ध करून दिला जाईल. सर्व संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांनी http://agridbtworkflow.mahaonline.gov.in या वेब लिंक वर जाऊन लॉगीन करावे व आपला आधार क्रमांक प्रमाणित करुन घ्यावा तसेच आपला पासवर्ड बदलून घ्यावा. त्याचप्रमाणे कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने अधिकारी / कर्मचाऱ्यांशी संपर्क साधण्यासाठी तसेच त्यांना वेळोवेळी संदेश / दिशानिर्देश देण्याकरिता सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना शासकीय ई-मेल आय.डी. उपलब्ध करून देण्याबाबत कृषि आयुक्तालय स्तरावरुन कार्यवाही करणेत येईल.

### ९.५ योजनांच्या वित्तीय लक्षांकाचे व्यवस्थापन :

योजनांच्या वित्तीय लक्षांकाच्या वित्तीय व्यवस्थापनाचे कामकाज कृषि आयुक्तालयाच्या स्तरावरून करण्यात येईल. कृषि विभागाच्या विविध योजनांकरिता प्रतिवर्ष प्राप्त होणारा वित्तीय लक्षांक महा-डीबीटी पोर्टलवर भरणे, त्यांचे जिल्हा / तालुका निहाय व प्रवर्ग निहाय (सर्वसाधारण, अनु. जाती व जमाती, महिला, दिव्यांग इ.) वितरण करणे, आवश्यकतेनुसार त्याचे फेरवितरण करणे इ. कामांसाठी तसेच सर्व योजनांच्या वित्तीय लक्षांकाचे महा-डीबीटी पोर्टलवर व्यवस्थापन करण्यासाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याबाबत सविस्तर माहिती User Manual द्वारे उपलब्ध करून देण्यात येईल. या योजनेसाठी आयुक्त (कृषि) यांनी आयुक्तालयातील कृषि उपसंचालक फलो-४ यांना योजना व्यवस्थापक (Scheme Manager) म्हणून घोषित केले असुन ते योजनेच्या वित्तीय लक्षांकाचे व्यवस्थापन करतील.

### ९.६ अर्जांची छानन्नी व मंजुरी:

महा-डीबीटी पोर्टलवर कृषि विभागाच्या विविध योजनांतर्गत लाभ घेण्यासाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी बहुस्तरीय पद्धतीने करण्यात येणार असून त्याकरीता महा-डीबीटी पोर्टलवर विविध टप्पे (डेस्क) निर्माण केलेले आहेत. लाभार्थी शेतकऱ्यांच्या अर्जांची वेगवेगळया टप्प्यावर छाननी करावयाची असून त्याबाबतची कार्यपध्दती User Manual मध्ये तपशीलवार नमूद केलेली असून http://agridbtworkflow.mahaonline.gov.in या लिंक वर User Manual उपलब्ध करुन देण्यात आले आहे. प्राप्त अर्ज व कागदपत्रांची प्रत्येक डेस्कद्वारे पडताळणी करून पात्र शेतकऱ्यांना पुर्व-संमती आदेश निर्गमित करणे, शेतकऱ्यांनी सादर केलेल्या देयकांची तपासणी करणे, क्षेत्र भेटीद्वारे झालेल्या कामाची प्रत्यक्ष मोका तपासणी करणे व शेतावरील सुक्ष्म सिंचन संचाचे भौगोलिक स्थान निश्चिती करून (जिओ-टॅगिंग) झालेल्या कामाचा अहवाल सादर करणे, पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना अनुदान वितरणाची शिफारस करणे इ. कामे करण्यात येणार आहेत. त्याकरीता या योजनेच्या अंमलबजावणीशी निगडीत असलेल्या क्षेत्रीय अधिकारी / कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या लॉगीन आय. डी. व पासवर्ड द्वारे महा-डीबीटी पोर्टलवर येऊन आपल्या लॉगीनला प्राप्त झालेल्या अर्जांचा निपटारा करावयाचा आहे. त्याचप्रमाणे ज्या बाबींकरीता कृषि विभागाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनी प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचे आदेश अथवा स्थळ पाहणी अहवाल अथवा अन्य आदेश अर्जासोबत जोडणे आवश्यक असल्यास ते जोडण्याची सोय महा-डीबीटी पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रत्येक डेस्कवर येणाऱ्या अर्जाचा निपटारा करण्याबाबत महा-डीबीटी पोर्टलवर विशिष्ट कालावधी विहित करण्यात आलेला आहे. सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांनी या कालावधीत अर्जांचा निपटारा करणे आवश्यक राहील.

९.७ महा-डीबीटी पोर्टलशी निगडीत कामाचे विभागांतर्गत समन्वय करणे, विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविणे व त्यांना प्रशिक्षण देणे, शेतकऱ्यांच्या तक्रार निवारण करणे इ. अनुषंगिक बाबींचे नियोजनाबाबत कृषि आयुक्तालय स्तरावर पूर्णवेळ व्यवस्थापनासाठी मदत कक्षाची निर्मिती करणेत येईल.

९.८ महा-डीबीटी समन्वय अधिकारी हे कृषि आयुक्तालयाच्या वतीने महा-आयटी महामंडळाशी नियमित संपर्कात राहून सद्यस्थितीत विकसित करण्यात आलेल्या प्रणालीचे मुल्यवर्धन करणे, प्रणालीमधील सुधारणा करणे, आवश्यक सुविधा विकसित करणे, तसेच तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने महाडीबीटी चमुस योजनेविषयक माहिती उपलब्ध करून देतील. शासनाशी समन्वय ठेवून महा-डीबीटी प्रणालीचे राज्य स्तरावरून संनियंत्रण करतील.

९.९ उन्नत शेती-समृद्ध शेतकरी अभियानांतर्गत तालुका हा कृषि नियोजनाचा व विकासाचा घटक निश्चीत केलेला आहे. त्यामुळे या योजनेसाठी सुक्ष्म सिंचन संच घटकांतर्गत प्रत्येक तालुक्यास समन्यायी पद्धतीने सर्वसाधारण,अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, महिला व दिव्यांग प्रवर्गाकरीता आर्थिक लक्षांक कृषि आयुक्तालय स्तरावरुन उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर आर्थिक लक्षांकाची माहिती महा-डीबीटी पोर्टलवर योजना / प्रवर्ग / तालुका निहाय भरावी आणि प्रत्येक योजनेसाठी विहित केलेल्या लक्षांकाच्या मर्यादेत एकत्रित संगणकीय सोडत प्रक्रियेद्वारे लाभार्थ्यांची निवड करावी. ज्या योजनेंतर्गत विशिष्ट घटकासाठी, बाबीसाठी अथवा प्रवर्गासाठी तालुका स्तरावर पुरेसा आर्थिक लक्षांक देणे शक्य नसेल त्या करीता जिल्हा स्तरावर लक्षांक विहित करण्यात यावा, तो महा-डीबीटी पोर्टलवर भरावा आणि एकत्रित संगणकीय सोडत प्रक्रियेद्वारे संबंधित जिल्ह्यातील लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

९.१० कृषि विभागाच्या विविध योजनांसाठी महा-डीबीटी पोर्टलद्वारे वर्षभर (२४ X ७) अर्ज स्वीकारले जातील व योजनांसाठी आर्थिक लक्षांकाच्या उपलब्धतेनुसार प्राप्त अर्जांची संगणकीय सोडत काढून लाभार्थी शेतकऱ्यांची निवड करण्यात येईल. सोडत काढण्यापूर्वी ३० दिवस अगोदर राज्यस्तरावरून वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करून शेतकऱ्यांना कृषि विभागाच्या विविध योजनांसाठी महा-डीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे कृषि आयुक्तालय स्तरावरुन आवाहन करण्यात येईल. तदनंतर संगणकीय प्रणालीद्वारे या योजनेची एकत्रित सोडत काढण्यात येईल आणि प्रत्येक तालुका / जिल्ह्यातील निवड झालेल्या लाभार्थ्यांची यादी व प्रतीक्षाधीन शेतकऱ्यांची यादी (क्रमवारीनुसार) योजना व प्रवर्ग निहाय पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात येईल.

९.११ एकत्रित सोडत प्रक्रीयेनंतर काही योजनांसाठी कमी अर्ज प्राप्त झाल्यामुळे तालुका / जिल्हा स्तरावर आर्थिक लक्षांक शिल्लक राहिल्यास, जिल्हा स्तरावरून तत्काळ जाहिरात देऊन पुनःश्च अर्ज मागविण्यात यावेत व नव्याने प्राप्त होणाऱ्या अर्जांसाठी पुन्हा एकत्रित संगणकीय सोडत प्रक्रीया राबवुन संबंधित तालुका / जिल्ह्यातील लाभार्थी निवडावेत. यानंतरही आर्थिक लक्षांक शिल्लक राहिल्यास, संबंधित योजनेंतर्गत अतिरिक्त निधीची मागणी असलेल्या तालुका / जिल्हा / विभागास निधीचे फेरवितरण करण्याबाबत यथास्थिती जिल्हा / विभाग आणि राज्य स्तरावरून (कृषि आयुक्तालय) यथोचित निर्णय घेण्यात येईल जेणेकरून तेथील प्रतीक्षाधीन यादीतील पात्र ठरणाऱ्या शेतकऱ्यांना लाभ देता येईल.

९.१२ या योजनेंतर्गत आर्थिक लक्षांकाचे फेरवितरण करतेवेळी प्रचलित कार्यपद्धतीनुसार, प्रथमतः तालुका स्तरावर अतिरिक्त ठरलेल्या लक्षांकाचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकाऱ्यांनी जिल्ह्यांतर्गत निधीची मागणी असलेल्या अन्य तालुक्यांना मागणीच्या प्रमाणात फेरवितरण करावे. जिल्हा स्तरावर अतिरिक्त ठरलेल्या लक्षांकाचे विभागातील अन्य जिल्ह्यातील निधीची मागणी असलेल्या तालुक्यांना विभागीय कृषि सहसंचालकांनी मागणीच्या प्रमाणात फेरवितरण करावे. विभाग स्तरावर अतिरिक्त ठरलेल्या लक्षांकाचे अतिरिक्त निधीची मागणी असलेल्या राज्यातील तालुका / जिल्ह्यांना कृषि आयुक्तालय स्तरावरून मागणीच्या प्रमाणात फेरवितरण करणेत येईल.

९.१३ ज्या लाभार्थ्यांची योजनेत निवड न होता ते त्या आर्थिक वर्षात प्रतीक्षा यादीत राहतील आणि ते पुढील वर्षी देखील त्याच बाबीसाठी लाभ घेऊ इच्छित असल्यास त्यांनी महा-डीबीटी पोर्टलवर त्यांचा मागील वर्षाचा अर्ज ग्राह्य धरण्याचा पर्याय निवडावा, त्याकरिता त्यांच्याकडून पुन्हा रु. २३.६०/- शुल्क आकारले जाणार नाही.

९.१४ शासन निर्णय दिनांक १२/१०/२०१८ अन्वये विहित केलेल्या कार्यपद्धती नुसार, राज्य स्तरावरुन (कृषि आयुक्तालय) महा-डीबीटी पोर्टलद्वारे विविध योजनांचा निधी केंद्रीय पद्धतीने लाभार्थ्यांना वितरीत करण्याकरिता कोषागारातून प्रत्येक योजनेसाठी प्राप्त होणारा निधी प्रथमतः त्या योजनेच्या PFMS प्रणालीशी संलग्नित बँक खात्यात जमा करणे व नंतर तो लाभार्थ्यांना वितरीत करण्यासाठी पुल खात्यावर (Pool Account) जमा करणे आवश्यक आहे.

९.१५ कृषि विभागासाठी महा-डीबीटी प्रणाली राज्य शासनाच्या महा-आयटी महामंडळाकडून विकसीत करण्यात आली आहे. या प्रणालीमध्ये कृषि विभागाच्या आवश्यकतेनुसार वेळोवेळी बदल / सुधारणा करणे तसेच, नवीन योजना अथवा नवीन घटकांचा सध्याच्या प्रणालीमध्ये अंतर्भाव करणे, महा-डीबीटी पोर्टलच्या वापरादरम्यान येणाऱ्या समस्यांचा (Bug fixing & any Runtime issues etc.) वेळेत निपटारा करणे, सदर प्रणालीचे सिक्युरिटी ऑडीट करुन घेणे, शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या संगणकीय प्रोटोकॉल व स्टॅन्डर्स नुसार पोर्टल अद्ययावत ठेवणे इ. संगणकीय प्रणाली विषयक आवश्यक मानकांची पूर्तता करण्याची जबाबदारी महा-आयटी महामंडळाची असेल.

९.१६ महा-आयटी महामंडळ हे कृषि विभागाशी नियमित संपर्कात राहुन कृषि विभागाच्या आवश्यकतेनुसार सदर प्रणालीचे मुल्यवर्धन करतील. त्याचप्रमाणे सदर प्रणालीमध्ये वरचेवर केल्या जाणाऱ्या सुधारणांच्या अनुषंगाने User Manual व प्रशिक्षण साहित्य विभागास उपलब्ध करुन देतील. महा-आयटी महामंडळाने शेतकऱ्यांकडून येणाऱ्या तक्रारींच्या निवारणासाठी तसेच कृषि विभागाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना पोर्टलच्या वापराविषयी येणाऱ्या अडीअडचणी वेळेत सोडवण्यासाठी महामंडळा अंतर्गत मदत कक्ष (Help Desk) स्थापन करणेत येईल.

## १०. अधिकारी /कर्मचारी भुमिका व जबाबदारी

**अ. कृषि पर्यवेक्षक –**

१. सुक्ष्म सिंचन संचाचे १०० % प्रस्तावांची मोका तपासणी कृषि सहायक यांचे मदतीने करावयाची आहे. ही तपासणी करत असतांना प्रस्तावासोबत लाभार्थ्यांचा प्राप्त ७/१२ वरील सर्व्हे नंबर , चतु:सीमा नुसार संच बसविलेले क्षेत्र एकच असल्याची खात्री करुन तपासणी करावी. तसेच ज्या शेतमालकाकडुन लाभार्थी/संस्था यांनी शेतजमीन भाडेतत्वावर घेतलेली आहे त्याच शेतमालकाच्या नांवाचे ७/१२ वरील सर्व्हे नंबर, चतु:सीमा नुसार संच बसविलेले क्षेत्र एकच असल्याची खात्री करुन तपासणी करावी.

२. तालुका कृषि अधिकारी यांच्याकडून सुक्ष्म सिंचन संचाचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कृषि पर्यवेक्षकांनी १० दिवसाच्या कालावधीत संचाची तपासणी करुन मोका तपासणी अहवाल सादर करणे.

३. कृषि पर्यवेक्षकांनी मोबाईल ॲपव्दारे भौगोलीक स्थानांकन (Geo tagging) पध्दतीने लाभार्थीची नोंदणी करणे अनिवार्य राहील. तसेच शेतकरी / शेतकरी प्रतिनिधी समवेत संचाचे अक्षांश / रेखांश सह फोटो काढून मोका तपासणी अहवालासोबत सादर करणे अनिवार्य राहिल.

४. प्रस्तुत योजनेत लाभार्थी सहभाग वाढविणेकरीता कृषि पर्यवेक्षक यांनी त्यांचे अधिनस्त कृषि सहायकामार्फत त्यांचे कार्यक्षेत्रात गावपातळीवरुन जनजागृती व योजनेची प्रचार, प्रसिद्धी करावी.

**ब. मंडल कृषि अधिकारी -**

१. लाभार्थी अर्जदाराकडून महा-डीबीटी पोर्टलव्दारे सादर केलेल्या प्रस्तावांतील कागदपत्रांची / अभिलेखांची तपासणी करणे, प्राप्त अर्जामधिल तपशिल (उदा. सर्वेनंबर प्रमाणे क्षेत्र, ८-अ प्रमाणे एकुण क्षेत्र, यापुर्वी लाभ घेतलेले क्षेत्र, क्षेत्रांचा सर्व्हे नंबर, लाभार्थी नांव इत्यादी) तपासुन छाननी करणे.

२. शासनाने विहीत केलेल्या मापदंडानुसार त्यांचे कार्यक्षेत्रातील सुक्ष्म सिंचन संचाची तपासणी करणे.

३. **कृषि पर्यवेक्षक यांचेकडुन त्यांचे कार्यक्षेत्रातील प्रकरणांची जसजशी मोका तपासणी करण्यात येईल तसतसे तपासणी केलेल्या प्रस्तावांपैकी मापदंडाप्रमाणे ३० टक्के रॅन्डम पद्धतीने तपासणी करणे अनिवार्य राहील. एकुण प्राप्त प्रकरणापैकी ३० टक्के तपासणीअभावी लाभार्थी शेतक-यांना अनुदानास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी**

मंडळ कृषि अधिकारी यांची राहील. त्यामुळे मंडळ कृषि अधिकारी यांनी दर आठवड्याला प्राप्त प्रकरणानुसार ३० टक्के प्रकरणांची तपासणी करुन तसा अहवाल तालुका कृषि अधिकारी यांना सादर करावा. मंडळ कृषि अधिकारी यांची मापदंडाप्रमाणे तपासणी झालेनंतरच प्रस्ताव अनुदान परीगणना तसेच अंतिम अनुदान अदायगीस स्विकारणेत येईल.

४. प्रस्तावासोबत लाभार्थ्यांचा प्राप्त ७/१२ वरील सर्व्हे नंबर, चतु:सीमा नुसार संच बसविलेले क्षेत्र एकच असल्याची खात्री करुन तपासणी करावी. तसेच तसेच ज्या शेतमालकाकडुन लाभार्थी/संस्था यांनी शेतजमीन भाडेतत्वावर घेतलेली आहे त्याच शेतमालकाच्या नांवाचे ७/१२ वरील सर्व्हे नंबर, चतु:सीमा नुसार संच बसविलेले क्षेत्र एकच असल्याची खात्री करुन तपासणी करावी.

**क. तालुका कृषि अधिकारी -**

१. सोडत निघाल्यानंतर संगणकीय प्रणालीमध्ये प्राप्त अर्जामधिल तपशिल (उदा. सर्वेनंबर प्रमाणे क्षेत्र, ८-अ प्रमाणे एकुण क्षेत्र, यापुर्वी लाभ घेतलेले क्षेत्र, क्षेत्रांचा सर्व्हे नंबर, लाभार्थी नांव इत्यादी) तपासुन स्वयंचलित संगणकीय प्रणालीद्वारे सुक्ष्म सिंचन संच बसविण्यासाठी उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत पुर्वसंमती देणे.
२. महाडीबीटी पोर्टलद्वारे विविध प्रक्रीया स्तरावर ऑनलाईन पध्दतीने प्रस्तावाची, कागदपत्रांची / अभिलेखांची तपासणी तालुका कृषि अधिकारी यांनी करावी.
३. लघु संदेशाव्दारे मागविलेल्या कागदपत्रांशिवाय कोणत्याही इतर कागदपत्रांची लाभार्थी शेतक-यांकडून मागणी करण्यात येवू नये.

४.जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून संबंधित कंपनीचे तांत्रिक प्रतिनिधी (Technical Representative) यांच्या प्राप्त झालेल्या नमुना स्वाक्षरीच्या प्रति (Specimen Signature) मोका तपासणीच्या अनुषंगाने सर्व कृषि पर्यवेक्षकांना उपलब्ध करुन देण्यात याव्यात. (परीशिष्ठ १४ सहपत्रित केले आहे.)
५. तालुका कृषि अधिकारी यांनी मापदंडाप्रमाणे २० टक्के प्रस्तावांची तपासणी करणे अनिवार्य राहील. तसा मासिक अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा. प्रस्तावासोबत लाभार्थ्यांचा प्राप्त ७/१२ वरील सर्व्हे नंबर , चतु:सीमा नुसार संच बसविलेले क्षेत्र एकच असल्याची खात्री करुन तपासणी करावी. तसेच तसेच ज्या शेतमालकाकडुन लाभार्थी/संस्था यांनी शेतजमीन भाडेतत्वावर घेतलेली आहे त्याच शेतमालकाच्या नांवाचे ७/१२ वरील सर्व्हे नंबर, चतु:सीमा नुसार संच बसविलेले क्षेत्र एकच असल्याची खात्री करुन तपासणी करावी.

## बील इन्व्हाईस (Bill Invoice) तपासणीच्या सर्वसाधारण बाबी

(अ) जीएसटीएन क्रमांक, सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनीने सादर केलेले व कृषि विभागाने मान्यता दिलेले किंवा त्यापेक्षा कमी दर असल्याची खात्री करावी
(ब) ठिबक सिंचन संचाकरीता लॅटरल, इनलाईन, इमिटर, फिल्टर, पाईप या घटकाचा तसेच तुषार सिंचन संचाकरीता एचडीपीई पाईप या प्रमुख घटकांचा बॅच नंबर देयकावर असल्याची खात्री करावी. देयकामध्ये बॅच नंबर नमुद नसल्यास देयक स्विकृत करु नये.
(क) बिल इनव्हाईस संबधित कंपनीचे असावे, ते जर कंपनीने नेमलेल्या अधिकृत वितरकाचे असेल तर त्या बिलावर अधिकृत कंपनी प्रतिनिधीची स्वाक्षरी,नाव व कंपनीचे सील/शिक्का असावा.

६. अर्जामध्ये नमुद केलेले पिक प्रत्यक्ष मोका तपासणीत आढळून आलेले नाही अशा अर्जदाराच्या अर्जातील सत्यता तपासावी व मोका तपासणीच्या वेळी Lateral Spacing मधील जे अंतर आढळून आले असेल, त्यानुसार प्रत्यक्ष अनुदानाची परिगणना करण्यात यावी.
७. सुक्ष्म सिंचन आराखडा तांत्रिकदृष्ट्या योग्य व आर्थिकदृष्ट्या किफायतशिर असल्याचे प्रमाणपत्र कंपनीचे तांत्रिक प्रतिनिधीनी (Technical Representative) त्यांचे नांव, दिनांकीत स्वाक्षरी व कंपनीच्या शिक्क्यासह प्रस्तावासोबत दिले आहे काय याची खात्री करावी तांत्रिक प्रतिनिधीचे नांव,नमुना स्वाक्षरी,कंपनी शिक्क्याचा

तपशील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाने उपलब्ध करुन दिलेल्या नमुन्याप्रमाणे असल्याची खात्री करुनच अनुदानासाठी शिफारस करावी.

८. सुक्ष्म सिंचन योजनेंतर्गत सहभागी लाभार्थी शेतक-यांची नोंदणी अथवा अनुदानासाठीचे अर्ज रद्द केल्यास असे अर्ज रद्द करण्याची कारणे स्पष्टपणे नमुद करुन लेखी स्वरुपात संबंधीत लाभाधारकास तालुका स्तरावरुन कळविण्यात यावे. तसेच संबंधीत सुक्ष्म सिंचन संच उत्पादक अथवा संबंधीत उत्पादकाचे अधिकृत वितरक /विक्रेत्यांना त्याची प्रत देण्यात यावी.

९. अनुदान प्रस्तावाची छाननी करताना शेतक-यांच्या मालकी हक्काचा ७/१२ व ८-अ उतारा, सिंचनाची सुविधा, कायमस्वरुपी विद्युत जोडणी, राष्ट्रीय बागवानी मंडळाकडून किंवा इतर कोणत्याही केंद्र किंवा राज्य योजनेतंर्गत मागील सात वर्षात सुक्ष्म सिंचन संचाकरीता लाभ घेतला नाही इत्यादी व इतर सर्व अनुषंगिक बाबी तपासाव्यात.

१०. तालुका कृषि अधिकारी मोका तपासणी अंती प्रत्यक्षात सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या लाभधारकाच्या प्रस्तावानुसार संदर्भ क्र.१ वरील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांमधील Annexure-IV a ते Annexure- IV f मध्ये देण्यात आलेल्या Drip Irrigation Technology - Indicative Bill of Quantities आणि Annexure-V ते Annexure-IX मध्ये देण्यात आलेल्या Indicative Bill of Quantities (BoQ) for Raingun Sprinkler Irrigation System तरतुदी व मानांकनानुसार शेतक-याने उपकरणे बसविलेली आहेत यांची खातरजमा करुन अनुदानाची परिगणना करतील. **तसेच शेतकऱ्यास अनुदानाची अदायगी करण्यासाठीचा प्रस्ताव तपासुन शिफारशीसह विहीत कालावधीत कृषि आयुक्तालय स्तरावर महा-डीबीटी पोर्टलव्दारे सादर करतील.**

११ . केवळ मोका तपासणीतील विलंबामुळे शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यात विलंब होत असल्याचे आंतरविभागीय तपासणीमध्ये दिसून आले आहे. त्यामुळे शासनाने विहीत करुन दिलेल्या वेळेत प्राप्त प्रस्तावांची छाननी पुर्ण करणे व कृषि पर्यवेक्षकाकडून विहीत कालमर्यादेत मोका तपासणीची कार्यवाही पुर्ण करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहील.

१२. **तालुका कृषि अधिकारी** कार्यालयातील कृषि अधिकारी **यांनी तालुक्यातील प्रत्येक गावात संच बसविलेल्या लाभार्थ्यांची यादी महाडीबीटी पोर्टलवरुन प्राप्त करुन त्या गावातील कृषिवार्ता फलकावर प्रसिद्ध करणेसाठी कृषि सहाय्यक यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यामध्ये लाभार्थ्याचे नांव, सर्वे नं, ठिबक / तुषार क्षेत्र, पीक व दिलेले अनुदान इत्यादी तपशिल असावा. सदरची यादी प्रसिद्ध केली किंवा नाही याची तपासणी करणेची जबाबदारी** तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि अधिकारी यांची राहील. तसेच सदर यादी "परीशिष्ठ १५" नुसार ग्रामंपंचायत कार्यालयास उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार कृषि सहायक यांनी **प्रत्येक तीन महिन्यानंतर प्रत्येक गावात बसविलेले ठिबक सिंचन / तुषार सिंचन संच लाभार्थ्यांची तपशिलवार माहिती त्या गावातील कृषि वार्ताफलकावर प्रसिध्द करावी.**

१३. शासनाने / कृषि विभागाने ठरवुन दिलेली भौतीक / गुणनियंत्रणाबाबतची तपासणी करणे.

१४. वितरक / विक्रेत्यांनी विहीत परिशिष्ट-५(क), परिशिष्ट-५(ड) आणि परिशिष्ट-५(इ) मधिल तालुका कृषि अधिकारी कार्यालयास सादर केलेली माहितीनुसार प्राप्त प्रस्तावांशी तुलना करुन सर्व बाबी प्रमाणित आढळल्यास तसे नमुद करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना दरमहा दि. १० तारखेपर्यंत सादर करावे. वरीलप्रमाणे पडताळणी न करता सादर केल्याचे आढळल्यास तालुका कृषि अधिकारी, तसेच कार्यालयातील संबंधीत अधिकारी व कर्मचारी जबाबदार राहतील.

१५. पात्र शेतकऱ्यास ५ हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेत लाभ दयावा, शेतक-यांने एखाद्या क्षेत्रावर यापुर्वी सुक्ष्म सिंचनासाठी अनुदानाचा लाभ घेतला असेल तर त्याच क्षेत्रावर ७ वर्षाच्या कालावधीनंतर प्रधान मंत्री कृषी सिंचाई योजनेच्या प्रती थेंब अधिक पीक (सुक्ष्म सिंचन) अनुदानाचा लाभ अनुज्ञेय राहील. याबाबतची खातरजमा करण्याची संपूर्ण जबाबदारी तालुका कृषि अधिकारी यांची राहील.

१६.महाडीबीटी संगणक प्रणालीद्वारे तालुका कृषि अधिकारी यांचेकडुन ऑनलाईन पद्धतीने अनुदानाची शिफारस होत असली तरी तालुका कृषि अधिकारी यांनी कार्यालयातील नस्तीमधुन अनुदानित करावायाच्या प्रस्तावांना मान्यता देऊनच अनुदान शिफारस करावे. त्याशिवाय अनुदान शिफारस करु नये त्याबाबतची खात्री निकटतम पर्यवेक्षीय अधिकारी यांनी करावी.

१७ वरील प्रमाणे सर्व खात्री करुन तालुका कृषि अधिकारी यांनी प्रस्ताव अंतिम करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे शिपारशीसह कृषि आयुक्तालय स्तरावर अनुदान वितरणासाठी सादर करावा.

## १८ . विविध लागवड अंतरावरील क्षेत्राकरीता खर्च मर्यादा व अनुदान मर्यादा.

अ. **ठिबक सिंचन** - केंद्र शासनाने सन २०१७-१८ मध्ये प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शक सुचनातील **परिच्छेद - ८ नुसार** ठिबक सिंचन संच उभारणीच्या खर्च मर्यादा निश्चीत केलेल्या आहेत. त्यानुसार विविध लॅटरल अंतर व प्लॉट साईजनुसार **ठिबक सिंचन** संचाचे अनुदान परिगणना करणेसाठी खालील प्रमाणे खर्च मर्यादा राहील.

आ.

| लॅटरल अंतर मीटर | ०.४ हेक्टर | १ हेक्टर | २ हेक्टर | ३ हेक्टर | ४ हेक्टर | ५ हेक्टर |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ x १२ | १५८५३ | २१६४३ | ३४४१७ | ५३४३७ | ६६४८० | ८४६५३ |
| १० x १० | १६४१९ | २३०४७ | ३७१७१ | ५७६४७ | ७२२०५ | ९१८०६ |
| ९ x ९ | १६८२६ | २४०३५ | ३९१४५ | ६०६१० | ७६२३८ | ९६८५२ |
| ८ x ८ | १७३५१ | २५३३२ | ४१६५० | ६४५०० | ८१५२७ | १०३४५९ |
| ६ x ६ | १९०९६ | ३०५३४ | ५१०४५ | ८२४७२ | १०००१६ | १२५४९८ |
| ५ x ५ | २०६७४ | ३४६६४ | ५९१५४ | ८५४८४ | १०८६३५ | १४५९६४ |
| ४ x ४ | २१४१४ | ३६५६२ | ६४०८४ | ९९९६५ | १३०८८४ | १५५७७८ |
| ३ x ३ | २३०५५ | ४२०३४ | ७२७५९ | ११२०६५ | १४०९३६ | १७६४५७ |
| २.५ x २.५ | ३११५६ | ६००६५ | १०९३४५ | १६७०११ | २३४३९६ | २८६२९७ |
| २ x २ | ३६३५८ | ७३१३८ | १४१९५७ | २०६२३२ | २८६५०४ | ३५१६६७ |
| १.५ x १.५ | ४१३६९ | ८५६०३ | १६३१३७ | २४३६३३ | ३३६४८४ | ४१४००२ |
| २.५० x ०.६ | ३०८१० | ६३१४५ | ११६०४२ | १७७३४५ | २४६२७६ | ३०२३१८ |
| १.८० x ०.६ | ३७८४५ | ८०५९९ | १५२५५१ | २२९६३७ | ३१२७८४ | ३८९५११ |
| १.२० x ०.६ (किंवा त्यापेक्षा कमी अंतर) | ५०३८८ | ११२२३७ | २१३४०० | ३२३०१९ | ४३५७८८ | ५४५१८१ |

**ब. तुषार सिंचन संच -**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार खालील प्रमाणे संच उभारणीच्या किंमती निर्धारीत केलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचनानुसार तुषार सिंचन संच उभारणीच्या निर्धारीत केलेल्या किंमती अनुदान परिगणना करण्यासाठी अंतिम समजण्यात याव्यात.

**अनुदान परिगणनेसाठी तुषार सिंचन संच उभारणीसाठी प्रति हेक्टरी खर्च मर्यादा (रुपये)**
**चल स्प्रिंकलर (पोर्टेबल)**

| क्षेत्र (हे) | ६३ मी.मी. | ७५ मी.मी. | ९० मी.मी. |
|---|---|---|---|
| १.०० हे.पर्यंत | १९५४२ | २१९०१ | ०.०० |
| २.०० हे. पर्यंत | २८३१३ | ३१३७२ | ०.०० |
| ३.०० हे. पर्यंत | लागू नाही | लागू नाही | ४२३४५ |
| ४.०० हे. पर्यंत | लागू नाही | लागू नाही | ५३४०४ |
| ५.०० हे. पर्यंत | लागू नाही | लागू नाही | ६०४५९ |

## मायक्रो स्प्रिंकलर

| क्षेत्र (हे) | अंतर ५ × ५ मी. | अंतर ३ × ३ मी |
|---|---|---|
| ०.४० | २९६१३ | ३४६३७ |
| १.०० | ५८९३२ | ६७२२१ |
| २.०० | १०३५८१ | १२११३८ |
| ३.०० | १४९३०५ | १७२९६८ |
| ४.०० | २०१६१२ | २३८८४५ |
| ५.०० | २५४८७२ | २९०९९५ |

## मीनी स्प्रिंकलर

| क्षेत्र (हे) | अंतर १० × १० मी. | अंतर ८ × ८ मी |
|---|---|---|
| ०.४ | ४१३६३ | ४३०२३ |
| १ | ८५२१२ | ९४०२८ |
| २ | १६००१३ | १७०११८ |
| ३ | २४२९८२ | २६३३६१ |
| ४ | ३१२७५२ | ३४४०१३ |
| ५ | ३८३१२३ | ४२५३५५ |

## सेमी पर्मनंट इरिगेशन सिस्टीम

| क्षेत्र (हे) | खर्च मर्यादा (रुपये) |
|---|---|
| ०.४ | २२५५७ |
| १ | ३६६०७ |
| २ | ६९८०४ |
| ३ | ९४२१८ |
| ४ | १२०३९२ |
| ५ | १४६०५३ |

## लार्ज व्हाल्यूम स्प्रिंकलर इरिगेशन सिस्टीम (रेनगन)

| क्षेत्र (हे) | ६३ मी.मी. | ७५ मी.मी. | ९० मी.मी. |
|---|---|---|---|
| १ | २८६८१ | ३४५१३ | लागू नाही |
| २ | लागू नाही | ४३७८६ | लागू नाही |
| ३ | लागू नाही | लागू नाही | ५६८१८ |
| ४ | लागू नाही | लागू नाही | ६५८५६ |
| ५ | लागू नाही | लागू नाही | ७२३२२ |

१. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत प्रति थेंब अधिक पिक सुक्ष्म सिंचन घटकांतर्गत लाभार्थ्यांना देय असलेले अनुदान खालीलप्रमाणे असेल.

| अ.क्र. | शेतकरी वर्गवारी | अनुदान मर्यादा |
|---|---|---|
| १. | अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी | अनुज्ञेय खर्चाच्या ५५ % अथवा प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या ५५ % यापैकी कमी असेल ते. |
| २. | इतर शेतकरी | अनुज्ञेय खर्चाच्या ४५ % अथवा प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या ४५ % यापैकी कमी असेल ते. |

ड. उपविभागीय कृषि अधिकारी -

१. महा-डीबीटी पोर्टव्दारे ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार उपविभाग स्तरावरुन योजना अंमलबजावणीचे सनियंत्रण करणे.
२. शासनाने/विभागाने ठरवुन दिलेल्या मापदंडानुसार तीन टक्के भौतीक/आर्थिक तपासणी करणे.
३. ही तपासणी करत असतांना प्रस्तावासोबत लाभार्थ्यांचा प्राप्त ७/१२ वरील सर्व्हे नंबर , चतु:सीमा नुसार संच बसविलेले क्षेत्र एकच असल्याची खात्री करुन तपासणी करावी. तसेच तसेच ज्या शेतमालकाकडुन लाभार्थी/संस्था यांनी शेतजमीन भाडेतत्वावर घेतलेली आहे त्याच शेतमालकाच्या नांवाचे ७/१२ वरील सर्व्हे नंबर, चतु:सीमा नुसार संच बसविलेले क्षेत्र एकच असल्याची खात्री करुन तपासणी करावी.
४. मापदंडाप्रमाणे ३ टक्के तपासणी करीत असतांना संचाच्या गुणवत्तेबाबत दोष आढळुन आल्यास खात्री करणेकरीता नमुना काढुन प्रयोगशाळेस तपासणीस पाठविणेबाबत कृषि उपसंचालक यांना लेखी पत्राद्वारे कळविणे. सदर नमुना संख्या कृषि उपसंचालक यांना देण्यात आलेल्या लक्षांकाचे व्यतिरिक्त राहील.

इ. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी -

१. कृषि आयुक्तालयस्तरावरुन पुर्वसंमतीसाठी महा-डीबीटी आज्ञावलीवर जिल्हानिहाय दर्शविण्यात आलेले अनुदान अधिनस्त तालुका कृषि अधिकाऱ्यांच्या लॉगइन मध्ये उपलब्ध करुन दयावे.
२. केंद्र शासनाकडून वेळो वेळी प्राप्त होणारा आकस्मिक निधी कृषि आयुक्तालयस्तरावरुन जिल्हास्तरावरील **PFMS** खात्यावर प्राप्त झाल्यानंतर प्राप्त निधीचे तालुकानिहाय वितरण करावे.

३. कृषि आयुक्तालयस्तरावरुन सन २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२० मध्ये सुक्ष्म सिंचन संच पुरवठा करण्यासाठी पाच वर्षासाठी नोंदणीस मान्यता देण्यात आलेल्या उत्पादक कंपन्यांना २०२०-२१ मध्ये नुतनीकरणास दि.०१/०६/२०२० रोजीच्या पत्राव्दारे मुदतवाढ देण्यात आलेली आहे. याच पत्राव्दारे सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांनी प्राधिकृत केलेल्या वितरक / विक्रेत्यांना जिल्हास्तरावरुन देण्यात येणा-या नोंदणीस देखिल मुदतवाढ देण्यात आलेली आहे. याकरीता वैधता मुदत संपलेले बँक गॅरंटी व अन्य कागदपत्रांची सन २०२०-२१ मध्ये पुर्तता करुन घेऊन नोंदणी देण्यात यावी.

तथापी कृषि आयुक्तालयस्तरावरुन सन २०२०-२१ मध्ये नविन नोंदणी देण्यात येणा-या, जिल्हे वाढीचे भरपत्र देण्यात येणा-या आणि नुतणीकरणास मुदतवाढ देण्यात आलेल्या उत्पादकांचे नविन वितरक नेमले असतील अशा सर्व वितरकांना संबंधीत जिल्हा स्तरावर सन २०१९-२० च्या विहीत अटी शर्तीच्या अधीन राहुन ई-ठिबक आज्ञावलीद्वारे नोंदणी देण्यात यावी. शासननिर्देशानुसार यथावकाश ई-ठिबक आज्ञावलीवरील माहिती महाडीबीटी पोर्टलवर अपलोड करण्यात येईल.

४. महा-डीबीटी पोर्टलव्दारे ठरवून दिलेल्या कालमर्यादेनुसार योजना अंमलबजावणीचे सनियंत्रण करावे.
५. प्रत्येक कंपनीने जिल्हयात पुरवठा केलेले व विक्री केलेल्या सहित्याची पडताळणी परिशिष्ठ ५ -अ, परिशिष्ठ ५ -ब व परिशिष्ठ ५ -क प्रमाणे प्रत्येक महिन्याला करावी. नोंदणीकृत विक्रेते यांचेकडील साठा नोंदवही विहीत केलेनुसार व पुर्ण केल्याचा तपासणी अहवाल तालुका कृषि अधिकारी यांचेकडुन प्राप्त करुन त्याप्रमाणे पडताळणी करुन अनुदानासाठी शिफारस केल्याची खात्री करावी.
६. केंद्र/राज्य/महालेखापाल यांच्या लेखापरिक्षण अहवालातील लेखा आक्षेपांची विहीत मुदतीत पुर्तता करण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहिल.
७. शासनाने/कृषि विभागाने ठरवून दिलेले भौतीक लक्षांकानुसार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांचे अधिनस्त स्थापित चमुने नमुने काढुन तपासणीसाठी पाठवावे. दिलेल्या लक्षांकाचे ७५ टक्के नमुने शेतक-याच्या शेतावरुन काढावेत तसेच उर्वरीत २५ टक्के नमुने गोडाऊन /सर्व्हिस सेंटरमधुन काढावेत.

८. जिल्हयातील सुक्ष्म सिंचन कार्यक्रम अंमलबजावणीबाबत भौतीक व आर्थिक सनियंत्रण करणे.

९. सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी केलेल्या लाभधारक शेतकऱ्याला विक्री पश्चात सेवा मिळत नसल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधीत वितरक व कंपनीवर केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनातील तरतुदीनुसार दंडात्मक कार्यवाही करावी. त्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे विभागीय कृषि सहसंचालक यांच्या मार्फत व त्यांच्या शिफारशीसह कृषि आयुक्तालयास सादर करतील.

१०. कंपनीचे अधिकृत तांत्रिक प्रतिनिधी यांची नावे व नमुना स्वाक्षरीसह सविस्तर तपशील परीशिष्ठ १४ नुसार कंपनीकडुन प्राप्त करुन तालुका कृषि अधिकारी यांना कळवावे.

११. सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या संचाची मोका तपासणी वेळेत पुर्ण होण्यासाठी जिल्हयातील तालुकानिहाय प्राप्त अर्जांचे प्रमाण विचारात घेवून, ज्या तालुक्यामध्ये अर्जाचे प्रमाण तुलनेत जास्त आहे. अशा तालुक्यासाठी अन्य तालुक्यातील कृषि पर्यवेक्षकांच्या सेवा मोका तपासणीच्या कामासाठी केवळ तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन दयाव्यात.

१२. सुक्ष्म सिंचन संचांना पुर्वसंमती तालुका कृषि अधिकारी यांचेमार्फत जिल्हयाला उपलब्ध निधीच्या मर्यादेत देण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत जास्त रकमेच्या प्रस्तावांना मान्यता देवून अतिरिक्त दायित्व निर्माण होणार नाही याबाबत वेळोवेळी अवलोकन करुन योजना अंमलबजावणीबाबत संनियंत्रण करावे.

१३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी ठरवुन दिलेल्या लक्षाकांच्या टक्केवारी प्रमाणे संचाची रॅंडम पध्दतीने तपासणी करावी. ही तपासणी करत असतांना ही तपासणी करत असतांना प्रस्तावासोबत लाभार्थ्यांचा प्राप्त ७/१२ वरील सर्व्हे नंबर , चतु:सीमा नुसार संच बसविलेले क्षेत्र एकच असल्याची खात्री करुन तपासणी करावी. तसेच ज्या शेतमालकाकडुन लाभार्थी/संस्था यांनी शेतजमीन भाडेतत्वावर घेतलेली आहे त्याच शेतमालकाच्या नांवाचे ७/१२ वरील सर्व्हे नंबर, चतु:सीमा नुसार संच बसविलेले क्षेत्र एकच असल्याची खात्री करुन तपासणी करावी.

**१४. जिल्हा स्तरावरील वितरक नविन नोंदणी सन २०२०-२१ करीता खालीलप्रमाणे कागदपत्रे घेण्यात यावे.**

१. विहीत प्रपत्रातील पुर्ण भरलेला वितरक नोंदणी अर्ज (फोटोसह)
२. वितरकांचे रु.१०० च्या स्टॅम्पपेपरवरील विहीत प्रपत्रातील करारनामा नोटरी केलेला.
३. रक्कम रु.१०,०००/- ची बॅंकेची स्टॅप पेपरवरील मुळ बॅंक गॅरेंटी प्रत व एक झेरॉक्स प्रत
४. वितरक नोंदणी शुल्क रक्कम रु.२७५०/-ची चलन पावती मुळ प्रत व एक झेरॉक्स प्रत (चलन ऑनलाईन ग्रास प्रणालीद्वारे काढलेले, पारीत करुन घेतलेले बॅंकेत भरणा केलेले)प्रस्तावासोबत सादर करावे.
५. सन २०२०-२१ अंतर्गत मान्यताप्राप्त उत्पादक कंपनीचे वितरक प्रमाणपत्र.
६. जी.एस.टी. प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत
७. पॅनकार्ड झेरॉक्स प्रत
८. वितरक दुकान स्थळ /जागेचा पुरावा ८ अ
९. दुकान भाड्याने घेतले असल्यास जागा मालकाचे नाव असलेला जागेचा उतारा किंवा ग्रामपंचायत /नगरपालिका करभरणा पावतीची झेरॉक्स प्रत
१०. दुकान नोंदणी प्रमाणपत्र (शॉपॲक्ट प्रमाणपत्र किंवा ग्रामपंचायत असल्यास ना हरकत प्रमाणपत्र / Udoga Adhar/परवाना
११. आधार कार्ड झेरॉक्स प्रत
१२. बॅंक पासबुक झेरॉक्स प्रत
१३. जिल्हाबाहेरील वितरकाने संबंधीत जिल्ह्यात नोंदणी केल्याचे संबंधीत कार्यालयाचे पत्र तसेच प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत

**विक्रेते/वितरक यांचेकडुन सादर करण्यात आलेली परिशिष्ठ ५ -अ, परिशिष्ठ ५ -ब व परिशिष्ठ ५ -क मधील माहिती तालुका कृषि अधिकारी यांचे शिफारशीसह प्राप्त करुन घ्यावी व अशाच विक्रेत्यांची नोंदणी करावी. शिफारस केलेल्या अहवालांची पडताळणी न करता विक्रेत्यांना नोंदणी दिल्यास जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयतील कृषि उपसंचालक व इतर तांत्रिक अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल. प्रथम नोंदणी करणाऱ्या वितरकांना प्रपत्र क,ड,ई सादर करणेबाबत अट लागु राहणार नाही.**

उपरोक्तप्रमाणे प्राप्त प्रस्तावांची छानणी करुन मागील वर्षात वितरकाने केलेल्या कामाच्या संदर्भातील तक्रारी/कामगिरी विचारात घेऊन नोंदणीबाबत निर्णय घ्यावा. तसेच नोंदणी झालेल्या कंपनीनिहाय वितरकांची यादी व सविस्तर तपशील जसे, बँक गॅरंटी, जी एस टी क्रमांक, मान्यताप्राप्त उत्पादक कंपनीचे वितरक प्रमाणपत्राची वैधता, नोंदणीकृत जिल्हे इत्यादीबाबत माहितीची नोंदवही कार्यालयात ठेवावी.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील तंत्र अधिकारी (फलोत्पादन) /कृषि उपसंचालक यांनी विक्रीपश्चात सेवा केंद्रास त्रैमासिक भेट देऊन पुरविणेत येणा-या सेवेबाबत निरीक्षण अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना **परीशिष्ठ १३ नुसार** सादर करावा. सदर अहवालाचे सँकलन तसेच नियंत्रण विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील तंत्र अधिकारी ( फलोत्पादन ) यांनी करावे.

प्रयोगशाळेत तपासणीस पाठविण्यात आलेल्या नमुन्यांचा मासिक अहवाल **परीशिष्ठ १२ नुसार** जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांनी विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय तसेच कृषि आयुक्तालयास सादर करावा.

**ई विभागीय कृषि सहसंचालक** -

सुक्ष्म सिंचन योजनेतील गुणवत्ता राखण्यासाठी विभागस्तरावर पथकांची स्थापना करून त्यांच्यामार्फत विभागातील क्षेत्रिय स्तरावर बसविलेल्या कमीत कमी **५ %** मात्र जास्तीत जास्त २५० सुक्ष्म सिंचन संचाची आंतरविभागीय रॅण्डम पध्दतीने निवड करून तपासणी करावयाची आहे.याचे संपूर्ण सनियंत्रण विभागस्तरावरुन करण्यात यावे. यासाठी पुढील प्रमाणे कार्यपध्दती अवलंबावी.

१. राज्यातील एका विभागाने दुस-या विभागातील जिल्हयांतर्गत बसविण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संचाची आंतरविभागीय तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आलेले आहे. त्यानुसार संबंधित विभागाने त्याच्यासमोर दर्शविलेल्या विभागाची तपासणी करावयाची आहे.

| अ. क्र. | ज्यांनी तपासणी करावयाची तो विभाग | ज्या विभागाची तपासणी करावयाची तो विभाग |
|---|---|---|
| १. | ठाणे विभाग | नाशिक विभाग |
| २. | नाशिक विभाग | पुणे विभाग |
| ३. | पुणे विभाग | ठाणे विभाग |
| ४. | कोल्हापुर विभाग | लातुर विभाग |
| ५. | औरंगाबाद विभाग | अमरावती विभाग |
| ६. | लातूर विभाग | कोल्हापुर विभाग |
| ७. | अमरावती विभाग | नागपूर विभाग |
| ८. | नागपूर विभाग | औरंगाबाद विभाग |

२. ज्या विभागाची तपासणी करावयाची त्या विभागाच्या विभागीय कृषि सहसंचालकाने तपासणी पथकास सर्व अभिलेख उपलब्ध करून द्यावेत. तसेच संबंधित क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांना तपासणीसाठी उपस्थित राहण्याच्या सक्त सुचना द्याव्यात.

३. तपासणी करणा-या विभागाच्या विभागीय कृषि सहसंचालकाने तपासणी करावयाच्या विभागातील विभागीय कृषि सहसंचालक यांचेशी संपर्क साधून त्यांच्या अधिनस्त असलेल्या प्रत्येक जिल्ह्यात सन २०१९-२० व २०२०-२१ मध्ये बसलेल्या संचांच्या तपासणीचे नियोजन करावे.

४. सदरची तपासणी करुन मार्च २०२१ अखेर तपासणी विहीत टक्केवारी / संच तपासणी मर्यादेनुसार पुर्ण होईल याद्दष्टीने नियोजन करावे.

५. विभागातील सर्व जिल्ह्यांत व सर्व तालुक्यात तपासणी होईल आणि ती तेथे बसलेल्या संचाच्या प्रमाणात असेल याची खात्री करण्याची जबाबदारी तपासणी करणा-या विभागाच्या विभागीय कृषि सहसंचालक यांची राहिल.

६. **तपासणी पथक** - प्रत्येक विभागात विभागिय कृषि सहसंचालक स्तरावर आंतरविभागीय तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे विशेष पथकांची स्थापना करण्यात यावी.

| अ.क्र. | तपासणी पथकातील सदस्य | तपशिल | सदस्य संख्या |
|---|---|---|---|
| १. | अधिक्षक कृषि अधिकारी,विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय | पथक प्रमुख | |
| २. | कृषि उपसंचालक/उप विभागीय कृषि अधिकारी | सदस्य | १ |
| ३. | तंत्र अधिकारी/तालुका कृषि अधिकारी | सदस्य | १ |
| ४. | मंडल कृषि अधिकारी/कृषि अधिकारी | सदस्य | १ |

७. विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील **अधिक्षक कृषि अधिकारी** यांनी पथक प्रमुख म्हणून आंतरविभागीय तपासणीचे नियोजन व संनियंत्रण करावे.

८. विभागीय कृषि सहसंचालक यांनी क्षेत्रिय व कार्यालयीन कामकाजाचा अंदाज घेऊन तपासणी पथकातील सदस्यांची निवड करुन तसे आदेश निर्गमित करावेत.

९. विभागीय कृषि सह संचालक यांनी तपासणीचा अहवाल त्यांच्या अभिप्रायासह कृषि आयुक्तालयास प्रत्येक तिमाहीच्या शेवटी सादर करावा. तथापी तपासणीत गंभीर त्रुटी /उणिवा / अनियमितता आढळून आल्या तर त्याबाबत तातडीने कारवाई करुन अहवाल कृषि आयुक्तालयास सादर करतील.

१०. तपासणी सोबतच्या **परिशिष्ट-४** मधील नमुन्यानुसार करण्यात यावी.

११. विभागीय कृषि सहसंचालक यांनी अधिनस्त सर्व कर्मचारी/अधिका-यांचे तपासणी अहवाल वेळेवर सादर होतील याचे संनियंत्रण व पाठपुरावा करावा.

१२. विभागीय कृषि सहसंचालक यांनी त्यांचे विभागातील भौतीक व आर्थिक प्रगतीचे सनियंत्रण करावे.

१३. आयुक्तालयाने नेमुन दिलेल्या संचाची व टक्केवारी प्रमाणे रँडम पध्दतीने तपासणी करतील.

### उ. कृषि आयुक्तालयस्तरारुन तपासणी -

कृषि आयुक्तालयस्तरावरून देखिल प्रत्येक विभागातील जिल्हांतर्गत बसविण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संचाची यादृच्छिक (Randam) पध्दतीने तपासणी करण्यात येईल.यासाठीचे पथक खालील प्रमाणे राहिल.

| अ.क्र. | पदनाम | तपशील |
|---|---|---|
| १ | कृषि सहसंचालक (फलोत्पादन) | पथक प्रमुख |
| २ | संबंधीत जिल्हयांचे जि.अ.कृ.अ.कार्यालयातील कृषि उपसंचालक | सदस्य |
| ३ | कृषि उपसंचालक (सिंचन) | सदस्य |
| ४ | कृषि अधिकारी, कृषि आयुक्तालय | सदस्य |

सदर पथकाने मागील वर्षामध्ये सर्वात जास्त सुक्ष्म सिंचन संच बसविलेल्या १० जिल्हयातील प्रत्येकी ५ सुक्ष्म सिंचन संचांची यादृच्छीक (Randam) पद्धतीने निवड करुन त्याची सखोल तपासणी करावी आणि त्याचा अहवाल संचालक (फलोत्पादन) यांना सादर करावा.

## ११ . कंपनी व वितरकांच्या जबाबदा-या

१. कंपनीने प्राधिकृत केलेल्या विक्रेते/ वितरकांना जिल्हास्तरावरुन सुक्ष्म सिंचन योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचन संच पुरवठा करणेसाठी नोंदणीस मान्यता देण्यात येईल.

२. सुक्ष्म सिंचन योजनेंतर्गत विक्रेता /वितरकास कमाल दोन कंपन्यांसाठी नोंदणी करता येईल.

३. सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनीच्या अधिकृत वितरकास लगतचे दोन जिल्हयात नोंदणी करता येईल. यासाठी कोणत्याही एका जिल्हयामध्ये नोंदणी शुल्क व आवश्यक रकमेची बॅक गॅरंटी सादर करुन नोंदणी करावी व त्याआधारे लगतच्या जिल्हयामध्ये नोंदणी करावी. यासाठी वेगळे शुल्क व बँक गॅरंटी देण्याची आवश्यकता नाही.

४. बिल इनव्हाईस संबधित कंपनीचे असावे, ते जर कंपनीने नेमलेल्या अधिकृत वितरकाचे असेल तर त्या बिलावर अधिकृत कंपनी प्रतिनिधीची स्वाक्षरी,नाव व कंपनीचे सील/शिक्का असावा. अशा अधिकृत कंपनी प्रतिनिधीच्या नमुना स्वाक्षरी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास द्यावी.

५. शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या बिलाच्या सर्व प्रतीवर शेतकरी / कंपनी प्रतिनिधीच्या प्रतिस्वाक्षरी घेऊन, स्थळप्रतीवर प्रत मिळाल्याची शेतकऱ्यांची किंवा त्यांच्या प्रतिनिधीची नावासह स्वाक्षरी घेणे बंधनकारक राहील. तसेच सदरच्या बिलाच्या तीन प्रती करुन एक प्रत प्रस्तावासाठी, एक प्रत शेतकऱ्यास व एक प्रत कंपनी /अधिकृत कंपनी प्रतिनिधी यांनी स्वत:च्या दप्तरी ठेवावी.

६. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार उत्पादक कंपन्यांना त्यांचे स्वत:चे दरपत्रक लागू करण्यास आणि त्यानुसार बिलींग करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे कंपनी अथवा अधिकृत कंपनी प्रतिनिधी शेतकऱ्यांना ठिबक / तुषार सिंचन संच साहित्य खरेदीचे जे बील देतील त्या बीलावर प्रत्यक्ष दराबरोबरच कंपनीने शासनास कळविलेले दर सुध्दा नमुद करणे वितरकांना बंधनकारक राहील जेणे करुन शेतकऱ्यांना कंपनीचे मुळ दरही अवगत होतील. तसेच सुक्ष्म सिंचन संचाचे लॅटरल, इनलाईन, इमिटर, फिल्टर, पाईप या प्रमुख घटकांचा किमान एक बॅच नंबर बिलावर असणे अनिवार्य आहे. देयकामध्ये बॅच नंबर नमुद नसल्यास देयक स्विकृत केले जाणार नाही.

| अ. क्र. | सुक्ष्म सिंचन संच घटक / साहित्याचा प्रकार | बॅच क्रमांक | सीएमएल क्रमांक | आकार | मीटर / संख्या | कंपनीने शासनास सादर केलेले दर (एम आर पी ) करविरहीत | विक्री दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

७. सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांच्या विविध घटकांच्या दरामध्ये कमीत कमी तफावत असावी, शक्यतो दर समांतर / सममुल्य असावेत (at par).

८. वितरकाने शेतकऱ्यांचे शेतावर संच बसविल्यानंतर उत्पादक कंपनी यांनी विक्रिपश्चात सेवा किमान ३ वर्ष मोफत पुरवाव्यात व संचाची निगा घेणेबाबत मार्गदर्शन करावे. वितरकाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी व कंपनी प्रतिनिधीने केलेली कार्यवाही याबाबतचे संनियंत्रण तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि अधिकारी यांनी करावे.

९. कंपनीच्या तांत्रिक प्रतिनिधीने (Technical Representative) अर्जदार शेतक-यांच्या शेताचे सर्व्हेक्षण करुन पिकाच्या दोन ओळीमधील अंतर, दोन रोपामधील अंतर, पिकनिहाय पाण्याची गरज, माती व पाणी परिक्षण अहवाल तसेच ज्या क्षेत्रावर संच बसवावयाचा आहे त्या क्षेत्राच्या चारही बाजुंचे जीपीएस (*GPS*) व्दारे सर्वेक्षण करुन सुक्ष्म सिंचन संचाचा आराखडा तयार करावा. तसेच, सर्वेक्षण केलेल्या क्षेत्राचा अक्षांश / रेखांश सह आराखडा प्रस्तावासोबत जोडण्यासाठी शेतकऱ्यांस उपलब्ध करुन दयावा. आराखड्यात तांत्रिक चुक असल्यास कंपनी प्रतिनीधी म्हणुन कंपनी जबाबदार राहील.वारंवार चुका घडत असल्यास संबंधीत कंपनीस जबाबदार धरुन त्यांचेवर कार्यवाही करणेत येईल.

१०. सुक्ष्म सिंचन संचाचा आराखडा ग्राफ पेपरवर असावा.आराखडा तांत्रिकदृष्ट्या योग्य व आर्थिकदृष्ट्या किफायतशिर असल्याचे प्रमाणपत्र कंपनीच्या तांत्रिक प्रतिनिधीने द्यावे. कंपनीने/कंपनी प्रतिनिधीने सदरचा आराखडा संबंधित शेतकऱ्यास द्यावा.

११. सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले विक्रेते / वितरकांनी तांत्रिकदृष्टया योग्य आराखडयाप्रमाणे संच बसविण्याची कार्यवाही कंपनीच्या मार्गदर्शनाखाली वितरकाच्या तांत्रिक प्रतिनिधीव्दारे (Technical Representative) पुर्ण करावी. संचातील घटक हे केंद्र शासनाने विहीत केलेले बीआयएस (BIS) दर्जाचे असणे बंधनकारक राहील.

१२. शेतक-यांच्या शेतावर वितरकामार्फत बसविलेल्या ठिबक सिंचन संचाच्या घटकामध्ये ३ वर्षाच्या कालावधीत काही उत्पादन दोष आढळून आल्यास तो सुस्थितीत करून देण्याची (Performance Warrantee) जबाबदारी वितरक / विक्रेता व कंपनीची राहील.

१३. तीन वर्षापर्यन्त विक्री पश्चात सेवा देणे कंपनींवर बंधनकारक राहील. लाभार्थी शेतक-यांना सुक्ष्म सिंचन संचामध्ये उत्पादन दोष / कार्यक्षमते संदर्भात काही तक्रार असल्यास, शेतकऱ्यांना तक्रार करता यावी याकरीता वितरकाने माहिती पुस्तकाबरोबर टोल फ्री क्रमांकही उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

सन २०१८-१९ व सन २०१९-२० या वर्षासाठी ई-ठिबक आज्ञावलीमध्ये कंपनी लॉग ईनमधुन विक्री पश्चात सेवा नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. विक्रीपश्चात सेवा तपशील ई-ठिबक आज्ञावलीमध्ये दैनंदिन नोंदविणेत यावा. तसेच ही सुविधा महाडीबीटी पोर्टलवर देखील विकसीत करण्यात येणार आहे.

**१४. सुक्ष्म सिंचन संच उत्पादक व पुरवठादार कंपनीने विक्री करत असलेल्या प्रत्येक जिल्ह्यात लाभार्थी शेतक-यांना विक्री पश्चात सेवा देणेकरीता प्रत्येक वर्षी माहे डिसेंबर या महिन्यात पंधरवाडा मोहिम राबविणे अनिवार्य आहे.**

१५.या आर्थिक वर्षामध्ये कंपनीने उत्पादीत केलेल्या व त्यांनी राज्यात विक्रीसाठी जिल्हानिहाय प्राधिकृत केलेल्या वितरकांना पुरविलेल्या सुक्ष्म सिंचन संच घटकांची माहिती सोबतच्या परिशिष्ट-५(अ) मध्ये व सुक्ष्म सिंचन संच विक्रीपोटी शासनास जमा केलेल्या वस्तु व सेवा कराची (GST) महीना निहाय माहिती परिशिष्ट-५(ब) मध्ये पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना हार्ड कापी द्वारे सादर करावे आणि कृषि आयुक्तालयास ई मेल द्वारे सादर करतील. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांनी खात्री करुन अहवाल स्विकारावे.

१६.वितरक / विक्रेत्यांनी आर्थिक वर्षामध्ये त्यांना प्राधिकृत केलेल्या कंपनीकडून विक्रीसाठी वितरीत केलेल्या व त्यांच्या स्तरावर प्राप्त झालेल्या सुक्ष्म सिंचन संच घटकांची माहिती विहीत **परिशिष्ट-५(क)** मध्ये व सुक्ष्म सिंचन योजनेंतर्गत शेतकऱ्यांना वितरीत केलेल्या सुक्ष्म सिंचन संच घटकांची माहिती **परिशिष्ट-५(ड)** मध्ये.(सदरची माहिती वितरकांनी त्यांचेस्तरावर ठेवलेल्या साठा नोंदवहीतील नोंदीवरुन उपलब्ध करुन दयावी) तसेच, सुक्ष्म सिंचन संच विक्रिपोटी शासनास जमा करण्यात आलेल्या वस्तु व सेवा कराची *(GSTR)* माहिती विहीत **परिशिष्ट-५(इ)** मध्ये पुढील महिन्याच्या *१०* तारखेपर्यंत तालुका कृषि अधिकारी यांना सादर करणे बंधनकारक राहील. १० तारखेपर्यंत असा हिशोब दिलेल्या अधिकृत विक्रेते / वितरक असलेल्या कंपन्यांचेच प्रस्ताव वितरक नोंदणीकरीता तालुका कृषि अधिकारी हे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करतील.

१७.वितरकांनी विहीत परिशिष्ठ ५ -अ, परिशिष्ठ ५ -ब व परिशिष्ठ ५ -क नमुन्यात साठा नोंद वही ठेवावी व ती दर तीन माहिन्यात तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि अधिकारी यांचेकडुन पडताळणी करावी व तशी नोंद साठा नोंदवहीत करावी.

१८. परिशिष्ठ ५-अ, परिशिष्ठ ५-ब व परिशिष्ठ ५-क मधील माहिती हस्तलिखीत साठा नोंदवही एवजी संगणककीकृत प्रिंट काढलेल्या प्रतीवर ( हार्ड कापी ) संबंधीत वितरकाचे सही शिक्का यासह सादर केल्यास स्विकारण्यात येईल.

१९. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनामधिल परिच्छेद १४(३) ते १४(७) मध्ये सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांनी स्वत: उत्पादीत करावयाचे घटक निश्चित केलेले आहेत. याव्यतिरिक्त सुक्ष्म सिंचन संच उभारणीसाठी आवश्यक असलेले अन्य घटक प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजना - प्रति थेंब अधिक पिक सुक्ष्म सिंचन घटकांतर्गत त्या त्या वर्षात सुक्ष्म सिंचनाची कामे करण्यास मान्यता देण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांकडून बाहयस्रोताव्दारे (outsourcing) वापरण्याची मुभा राहील. तथापी, बाहयस्रोताव्दारे (outsourcing) वापरलेल्या घटकांच्या गुणवत्तेची खात्री देण्याची जबाबदारी कृषि आयुक्तालयाकडुन नोंदणी दिलेल्या संबंधीत उत्पादक कंपनीवर बंधनकारक राहील.

राज्यामध्ये सुक्ष्म सिंचनाचे काम करण्यासाठी सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्यांची नोंदणी केली जाते.काही कंपन्या नोंदणी करतात परंतु राज्यामध्ये अत्यल्प प्रमाणात काम करतात. सन २०१९-२० मध्ये नोंदणी दिलेल्या कंपन्यांपैकी १७ कंपन्यांनी निरंक काम केले असुन २३ कंपन्यांनी अत्यल्प काम केल्याचे निदर्शनास येते. तसेच उत्पादक कंपन्यांना राज्यामध्ये काम करणेसाठी त्यांच्या मागणीप्रमाणे जिल्हे नेमुन दिले जातात. तरी देखील काही जिल्ह्यात सुक्ष्म सिंचनाचे काम होत नाही. कंपनी नोंदणीसाठी मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त होतात, कंपनीची संख्या अवास्तव वाढली जाते. योजना अंमलबजावणीसाठी कंपनीची उपयुक्तता विचारात घेता सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांनी निश्चित केलेल्या उद्दीष्टाप्रमाणे सुक्ष्म सिंचनाची कामे करण्याची जबाबदारी संबंधीत उत्पादकांची राहील. तथापी उत्पादक कंपनीला राज्यात किमान ५०० हे क्षेत्रावर सुक्ष्म सिंचनाची कामे करणे बंधनकारक राहील. तसेच मान्यता दिलेल्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान १०० हे क्षेत्रावर सुक्ष्म सिंचनाची कामे करणे बंधनकारक राहील.

## १२. सर्वसाधारण सुचना

### १. तुषार सिंचन संचाच्या पाईपवर एम्बॉसींग -

तुषार सिंचन संच हा एका जागेवरुन दुसरीकडे सहज हलविता येण्यासारखा असतो. लाभधारक शेतकऱ्यांकडे प्रत्यक्ष संचाची तपासणी करताना हा संच दुसऱ्या शेतकऱ्यांकडून आणला जाऊ नये व त्यामुळे एका संचावर दोन वेळा अनुदान दिले जाऊ नये म्हणून तुषार संचाचे पाईपच्या जोडावर, फिमेल पार्टवर एम्बॉसींग करुन पुढीलप्रमाणे मजकूर लिहावा " *शेतकऱ्याचे नाव, गाव, संच बसविल्याचे वर्ष व सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनी* ". सदरचा मजकूर ठळकपणे व सहजपणे वाचता (normal eyesight) येईल असा सुस्पष्टपणे वितरकाकडून संच हस्तांतरीत करण्यापुर्वी कोरुन टाकण्यात यावा. कोरल्यानंतर त्यावर रंग द्यावा. मजकूर कोरतांना शक्यतो साधे मशीनद्वारे कोरावा. मजकूर सहजासहजी नष्ट होणार नाही अशा स्वरुपात असावा. हा मजकूर लिहिला आहे याबाबतची क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या मोका तपासणीच्या वेळी खात्री करावी व त्याची नोंद मोका तपासणी अहवालात घ्यावी. मोका तपासणीत वरील प्रमाणे एम्बॉसींग आढळले नाही तर मोका तपासणी करणा-या अधिका-याने अशा संचाचे अनुदान अदा करू नये अशी शिफारस करावी.

### २. सुक्ष्म संच घटकांचे बिल व बिलींग §

१. केंद्र शासनाने दोन ओळी व दोन रोपांमधील अंतरासाठी क्षेत्रनिहाय ठिबक संचाच्या लॅटरलच्या अंतरानुसार क्षेत्रनिहाय संचासाठी सुचक साहित्य गरज (Indicative Material Requirement) ठरवुन दिलेली आहे. शक्यतो त्याप्रमाणे संच उभारणी करुन वितरकांनी शेतक-यांना बिल देणे अपेक्षित आहे.

वितरकांनी शेतक-यांना पक्की बीले द्यावीत. आगाऊ कच्ची बिले शेतक-यांना देऊ नयेत तसेच देयकावर कंपनी प्रतिनधी यांची प्रतिस्वाक्षरी घ्यावी. संचासाठी निर्धारीत केलेले साहित्याव्यतिरिक्त इतर बाबींच्या अथवा घटकांच्या किंमतींचा अंतर्भाव बिलात करु नये. वाहतुक व जोडणी खर्च उत्पादक कंपन्यांनी करावयाचा आहे. यासाठी कंपन्यांनी किंवा वितरकांनी शेतक-यांकडुन जास्तीची रक्कम घेऊ नये.

२. बिलामध्ये प्रमुख घटकाचा (उदा. इनलाईन,लॅटरल, ईमिटर, पाईप, फिल्टर, एचडीपीई पाईप इ.)बॅच_नंबर नमूद करणे आवश्यक आहे. देयकामध्ये बॅच नंबर नमुद नसल्यास देयक स्विकृत केले जाणार नाही.

३. शासनाने निर्धारीत केलेल्या विविध लॅटरल अंतरासाठी निश्चित केलेल्या संच उभारणी खर्च मर्यादेपेक्षा कमी किंमतीचे बील असेल, तर घटकांची खात्री करुन बिलाच्या रक्कमेवर अनुदानाची परिगणना करावी. मात्र विविध लॅटरल अंतरासाठी निश्चित केलेल्या संच उभारणी खर्च मर्यादेपेक्षा जास्त किंमतीचे बील असेल, तर घटकांची खात्री करुन संबंधीत लॅटरल अंतरासाठी शासनाने निर्धारीत केलेल्या संच उभारणी खर्च मर्यादा रक्कमेवर अनुदान परिगणना करावी. कोणत्याही परिस्थितीत जास्तीचे अनुदान अदा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

## १३. क्षेत्रिय तपासणी -

योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याच्या दृष्टिने सोबतच्या विहीत **परिशिष्ट-४** मधिल नमुन्यात खालील प्रमाणात तपासणी करण्यात यावी.

| | |
|---|---|
| १. मंडल कृषि अधिकारी | -३० % |
| २. तालुका कृषि अधिकारी | -२० % |
| ३. उपविभागीय कृषि अधिकारी | - ३ % |
| ४. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - १ % |
| ५. विभागीय कृषि सह संचालक | - ५ संच / माहे |
| ६. संचालक फलोत्पादन | - १ संच / माहे |

वरीलप्रमाणे तपासणी अहवाल मंडल कृषि अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी यांना सादर करावा. तसेच तालुका कृषि अधिकारी यांनी उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावा. उपविभागीय कृषि अधिकारी यांनी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करावा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी

विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करावा. तसेच विभागीय कृषि सह संचालक यांनी संचालक फलोत्पादन यांना अहवाल सादर करावा. याप्रमाणे तपासणीचा अहवाल **परिशिष्ट-४ (क)** मध्ये दरमहा त्या त्या वरीष्ठ कार्यालयाकडे सादर करावा.

दौरा दैंनंदिनी मंजुर करतांना वरीलप्रमाणे विहीत टक्केवारीत तपासणी झाल्याची खात्री करुनच दैनंदिनी मंजुर कराव्यात.

## १४. गुणवत्ता नियंत्रण -

ठिबक/तुषार सिंचन संच घटकांचे साहित्य बीआयएस (BIS) दर्जाचे असणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सुक्ष्म सिंचन संच उत्पादक व पुरवठादारास नोंदणीस आणि सुक्ष्म सिंचन योजनांतर्गत सुक्ष्म सिंचनाची कामे करण्यास मान्यता देण्यात आली आहे. बीआयएस या संस्थेकडून प्रमाणपत्र धारकाचे नमुने घेतले जात असतात व गुणवत्ता नियंत्रणाची काळजी घेतली जाते.

कृषि विभागातील क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत सुध्दा नमुने काढून तपासणी करवून घेण्याची कार्यवाही गेल्या काही वर्षापासून सुरु आहे. केंद्र शासनाने संदर्भ क्र.१ अन्वये निर्गमित केलेल्या कार्यात्मक मार्गदर्शक (Working Guideline) सुचनामधील **परिच्छेद - १७ मध्ये गुणवत्ता नियंत्रणाबाबत** सविस्तर सुचना दिलेल्या आहेत. यामध्ये सुक्ष्म सिंचन योजनेंतर्गत बसविण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संचाची क्षेत्रिय तपासणी आणि वेळोवेळी करावयाच्या पहाणी तसेच, सुक्ष्म सिंचन संच घटकांचे नमुने काढण्यासाठी राज्यस्तरीय मंजूरी समितीने संयुक्त तपासणी चमु तयार करण्याच्या सुचना आहेत. त्यानुसार प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेच्या दिनांक १६/०८/२०१७ रोजीच्या चौथ्या राज्यस्तरीय मंजूरी समितीच्या बैठकीमध्ये खालील प्रमाणे चमु गठीत करण्यास राज्यस्तरीय मंजूरी समितीने मान्यता दिलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| **१. कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय** | - | **चमु प्रमुख** |
| **२. संबंधित मंडल कृषि अधिकारी** | - | **सदस्य** |
| **३. कंपनीचा अधिकृत प्रतिनिधी** | - | **सदस्य** |
| **४. कंपनीचे अधिकृत विक्रते / वितरक** | - | **सदस्य** |

उपरोक्त पार्श्वभूमी व केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना विचारात घेऊन,चालू आर्थिक वर्षामध्ये प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेंतर्गत - प्रति थेंब अधिक पीक सुक्ष्म सिंचन घटकांतर्गत बसविण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संच घटकांचे नमुने काढण्यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. सुक्ष्म सिंचन संच घटकाचे तीन नमुने तपासणी चमुने संयुक्तपणे तपासणीसाठी काढावेत.

२. सुक्ष्म सिंचन बसविल्यापासून तीन वर्षाच्या कालावधित सदर चमुने क्षेत्रियस्तरावरुन कालबध्दरित्या याद्दच्छीक पध्दतीने (random) सुक्ष्म सिंचन संच घटकांचे नमुने घ्यावेत.

३. सदर नमुने विहीत **परिशिष्ट- ८** नुसार योग्यरित्या नमुन्याचे वर्णनदर्शक तपशिल नमुद करुन स्वाक्षरीत करावेत आणि त्यानंतरच नमुने सिलबध्द करावेत.यापैकी *एक नमुना* तपासणीसाठी अधिकृत प्रयोगशाळांकडे कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय यांनी पाठवून तपासून घ्यावेत, दुसरा नमुना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांनी त्याचे कार्यालयस्तरावर जतन (in the custody of nodal officer) करावा. उर्वरीत एक नमुना *सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनी प्रतिनिधीकडे* जतन करण्यासाठी देण्यात यावा. त्याची रितसर पावती कृषि उपसंचालक यांनी कंपनी प्रतिनिधीकडून घ्यावी व त्यांचेस्तरावर जतन करावी.

४. सुक्ष्म सिंचन संचातील सर्व महत्वाच्या घटकांचे बॅचनंबरसह नमुने काढणे अनिवार्य (Mandatory) राहील.

५ **नमुना कोठून घ्यावा** - राज्यस्तरीय सूक्ष्म सिंचन समितीने ठरवून दिलेल्या कार्यपध्दीनुसार ज्या सुक्ष्म सिंचन संच उत्पादकांना योजनेंतर्गत कामे करण्यास मान्यता दिलेली आहे अशा उत्पादकांच्या कारखाना ते शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्षात बसविलेले संच या साखळीमधून नमुने घ्यावेत. यामध्ये प्राधान्याने शेतकऱ्यांच्या शेतातूनच नमुने काढावेत. शेतातून नमुने काढणे शक्य नसल्यास तसे कारण नमुद करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या परवानगीने उत्पादकांच्या कारखान्यातून / गोडावूनमधून व त्यांचे प्राधिकृत वितरकांकडून नमुने घ्यावेत. मुख्यत: उत्पादकाकडून नमुना घेतेवेळी उपलब्ध असलेल्या वेगवेगळ्या लॉटची यादी मिळवावी व त्यामध्ये रॅन्डम पध्दतीने लॅाटमधून खालील दिलेल्या प्रमाणात नमुने घ्यावेत. नमुना उत्पादक कंपनी प्रतिनिधी / वितरक यांचे समक्ष घ्यावा व तो नमुना त्यांचे समक्ष सीलबंद करावा. त्यावर चमुतील सदस्यांसह उपस्थित सर्व प्रतिनिधीची स्वाक्षरी घ्यावी. दिलेल्या लक्षांकाचे ७५ टक्के नमुने शेतक-याच्या शेतावरुन काढावेत तसेच उर्वरीत २५ टक्के नमुने गोडाऊनमधुन काढावेत

६ ठिबक / तुषार संच घटकांचा नमुना परिमाण

सिपेट (Centre for Skilling & Technical Support) रसायने आणि खते मंत्रालय,भारत सरकार , नवी दिल्ली यांचे दि.०५/२/२०२० रोजीचे पत्रानुसार ठिबक / तुषार संच घटकांचा नमुना परिमाण खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले असुन त्यानुसार कार्यवाही करावी.

| अ. क्र. | ठिबक/तुषार घटकाचे नाव | बीआयएस क्रमांक | तपासणीच्या बाबी | प्रती नमुना आवश्यक परिमाण मीटर/संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | लॅटरल | १२७८६ | 1. Identification & composition analysis<br>2.Thickness<br>3.Pressure Test<br>4.Dimensions | ०५ मीटर |
| २. | इमिटींग पाईप (इनलाईन) | १३४८८ | | ३० मीटर |
| ३. | एचडीपीई पाईप | ४९८४ आणि १४१५१ (भाग-२) | 1. Identification & composition analysis<br>2.Thickness<br>3.Pressure Test<br>4.Dimensions | १ मीटर x ०४ नग ,Plain Pip<br>१ मीटर x ०२ नग ,Male & Female coupler pipe<br>१ मीटर x ०२ नग Fused |
| ४. | पीव्हीसी पाईप्स (UPVC Pipes IS: 4985) | ४९८५ | 1. Identification & composition analysis<br>2.Thickness<br>3.Pressure Test<br>4.Dimensions | १ मीटर |
| ५. | इमीटर (ड्रीपर) | १३४८७ | 1. Identification & composition analysis<br>2. Flow rate | ५० नग |

**७. शेतकऱ्यांच्या शेतावरुन नमुना काढण्याची पध्दत -**

७.१ शेतकऱ्यांच्या शेतावर ठिबक/तुषार संच बसविलेनंतर संयुक्त तपासणी चमुने शेतकऱ्याकडील ठिबक/तुषार सिंचन संच घटकाचे तीन नमुने तपासणीसाठी काढावेत

७.२ शेतकऱ्यांच्या शेतावर नमूना काढताना रॅन्डम पध्दतीचा अवलंब करावा. संयुक्त तपासणी चमुने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून त्यांच्या कार्यक्षेत्रातील ठिबक/तुषार संच बसविलेल्या शेतकऱ्यांची यादी प्राप्त करावी. सदरची यादी कंपनीनिहाय असावी, प्राप्त केलेल्या यादीतून रॅन्डम पध्दतीने शेतकऱ्यांच्या नावाची निवड करावी व निवडलेल्या शेतकऱ्याच्या शेतातील नमूना काढावा.

७.३ ज्या शेतकऱ्याच्या शेतावरील नमुना घेण्यात येणार आहे, अशा शेतकऱ्याच्या उपस्थितीत नमूना काढावा. स्वत: शेतकरी उपस्थित राहु न शकल्यास शेजारचे शेतकरी यांचे समक्ष नमुना काढावा. अपवादात्मक

परीस्थितीमध्ये अशावेळी कंपनी / वितरक यांचे प्रतिनिधी यांचेसमक्ष नमुना काढावा. असा नमूना काढल्यानंतर सिलबंद करावा व त्यावर संबंधित शेतकरी / प्रतिष्ठित नागरिक यांची स्वाक्षरी घ्यावी.

७.४ नमुना तपासणी होईपर्यंत त्याची साठवणुक व हाताळणी योग्य प्रकारे करावी. जेणेकरुन कुठल्याही प्रकारचे Mechanical Dammage होणार नाही याची काळजी चमुने घ्यावी. शेतक-याच्या शेतातुन नुमना घेतांना ईमिटींग पाईप , लॅटरल, ईमिटर (ड्रीपर) या घटकांचे टेस्टींग करणेपुर्वी ३ ते ३.५ किग्रॅम प्रती वर्ग सेमी.पाण्याच्या दाबावरती योग्य प्रकारे साफ करुन घेणे गरजेचे आहे. ही जबाबदारी चमुतील कंपनी प्रतिनिधीची राहील. ज्यामुळे कुठलेही भौतिक घन पदार्थ त्यामध्ये राहणार नाही. नमुना योग्य प्रकारे साफ करुन घेतल्यानंतरच त्याचे संदर्भिय मानांकनानुसार (बीआय एस) नुसार गुणवत्ता परिक्षण करावे.

**८. नमुना सिलबंद करणेची पध्दती -**

८.१ लॅटरलचे / इमिटिंग पाईपचे नमुने काढल्यानंतर त्याची योग्य गुंडाळी करावी, गुंडाळी करताना ते चेपले जाणार नाहीत अशा बेताने गोल गुंडाळी करावी व गोल गुंडाळी केल्यानंतर त्याला सुतीपट्टीने व्यवस्थीत गुंडाळावे. सर्व बाजूने सुतीपट्टीने गुंडाळल्यानंतर ज्याठिकाणी गुंडाळी संपेल तेथे सुतीपट्टीच्या गाठीवर लाखेचे सील करावे.

ड्रीपरचे नमुने सुती कापडी पिशवीत घालून ती पिशवी सीलबंद करावी (ड्रीपरचे नमुने शेतातून घेताना ते वेगवेगळ्या ठिकाणावरुन घेण्यात यावेत)

८.२ सीलबंद केलेली लॅटरल / इमिटिंग पाईपचे गुंडाळी व ड्रीपरचे पिशवीमध्ये **परिशिष्ट-८** प्रमाणे तयार केलेले माहिती पत्रक, काढलेला नमूना सीलबंद करताना कापडी पिशवीत न टाकता जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयस्तरावर स्वतंत्र नस्ती मध्ये जतन करावे. तसेच त्याची एक प्रत कंपनी प्रतिनिधीसही उपलब्ध करुन देण्यात यावी.

८.३ शेतकऱ्याच्या शेतातून काढलेला नमूना स्वच्छ धुवावा. असे नमुने शेतक-यांच्या शेतातून काढले याबाबतचा उल्लेख परिशिष्ट-८ मध्ये करावा, म्हणजे तपासणी करताना संबंधित प्रयोगशाळा योग्य ती काळजी घेऊ शकेल.

८.४ शेतकऱ्यांच्या शेतातून नमुना काढल्यानंतर शेतकऱ्याचा संच बंद होणार नाही, याची शक्यतो काळजी घ्यावी. ज्या ठिकाणातून नमुने काढले असतील अशा ठिकाणी संबंधित वितरकाकडून नवे साहित्य बसवून घ्यावे व संच संबंधित वितरकाकडून तातडीने कार्यान्वीत करुन घ्यावा. नमूना काढलेल्या ठिकाणी पुन्हा साहित्य बसवून देण्याची जबाबदारी संबंधित वितरकाची राहिल.

८.५ एचडीपीई व पीव्हीसी पाईपचे नमुन्यांच्या बाबतीत उपरोक्त १ ते ३ प्रमाणे कार्यपध्दती अवलंबावी.

९. तपासणी चमु प्रमुखाने काढलेल्या नमुन्यांची नोंद **परिशिष्ट-१०** मधिल नोंदवहीत घ्यावी. कृषि आयुक्तालयाकडून कळविण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन संच उत्पादकनिहाय प्रत्येक घटकाचा सीएमएल नंबर काढलेल्या नमून्याशी पडताळून पहावा.

१०. तपासणी संस्थेकडे नमुने पाठवताना संस्थेस पाठवावयाच्या पत्रामध्ये नमुन्याचा कोड व सुक्ष्म सिंचन संच घटकाचा तांत्रीक तपशिलच (Technical specification) पाठवावा. गोपनीयतेच्या दृष्टीने कोणत्याही परिस्थितीत **परिशिष्ट-८** तपासणी संस्थेस पाठविण्यात येवू नये.सिल केलेल्या नमुन्यावर(कापडी गुंडाळी) मार्कर पेनव्दारे केवळ नमुन्याचा कोड क्रमांक व बीआयएस क्रमांक ठळकपणे नमुद करावा.

११. तपासणी संस्थेकडे पाठवावयाच्या तपशिलाचा नमुना सोबत परिशिष्ट-०९ मध्ये देण्यात आलेला आहे. सदर परीशिष्ठ -९ मधील तपशील संबंधीत कृषि उपसंचालक यांनी पत्राद्वारे प्रयोगशाळेस कळविण्यात यावे. तपशीलाव्यतिरीक्त **अधिकची माहिती प्रयोगशाळेस देऊ नये.**

१२. नमुन्याला कोड देण्याची पध्दती सोबत **परिशिष्ट-११** मध्ये देण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे दण्यात येत आहे.

- **नमुना कोड - MI LT PN-001-20-21** - यामध्ये म्हणजे MI - Micro Irrigation, LT- Lateral, PN - जिल्हाचे संक्षेपन(पुणे जिल्हा), ००१ - नोंदवहीतील क्रमांक व २०-२१ वर्ष दर्शविते.

१३. नमुना कोडमध्ये जिल्हयाचे संक्षेपन किमान २ व कमाल ३ अद्याक्षराच्या मर्यादेत असावे.(उदा. नंदुरबार - NDB, अहमदनगर - AMD, बीड - BD इत्यादी)

१४. नमुने काढणे सिलबंद करणे तसेच नमुने काढण्यासाठी क्षेत्रस्तरावरील प्रवासासाठीचा खर्च जिल्हास्तरावर सुक्ष्म सिंचन योजनेंतर्गत उपलब्ध असलेल्या आकस्मिक निधीतून खर्च करावा.

१५. काढण्यात आलेल्या नमुन्यांचा तपशिल सोबतचे **परिशिष्ट-१२** मध्ये दर महिन्याला जिल्हास्तरावरील कृषि उपसंचालक यांनी कृषि आयुक्तालयास सादर करावा.

१६. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना मापदंडाप्रमाणे निश्चित केलेल्या गुणनियंत्रण तपासणी दरम्यान त्यांचे कार्यक्षेत्रातील सुक्ष्म सिंचन संच तपासणीचे वेळी संचाचे गुणवत्तेबाबत दोष आढळुन आल्यास खात्री करणेकरीता पर्यवेक्षिय अधिकारी म्हणुन त्यांना सुक्ष्म सिंचन संच नमुना काढुन तपासणीस पाठवता येईल. सदर नमुना संख्या कृषि उपसंचालक यांना देण्यात आलेल्या लक्षांकाच्या व्यतिरीक्त राहील.

१७. नमुना घेतांना स्थापित चमुतील सर्व सदस्यांनी स्वत: उपस्थित राहुन नमुने काढावेत. चमुतील फक्त एक सदस्याने तसेच चमु व्यतिरिक्त कोणत्याही प्रतिनिधीने नमुना काढु नये.

१८. दिलेल्या लक्षांकाचे ७५ टक्के नमुने शेतक-याच्या शेतावरुन काढावेत तसेच उर्वरीत २५ टक्के नमुने गोडाऊन मधुन काढावेत.

१९. नमुना कोडींगच्या गोपनीयतेची सर्वस्वी जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांची राहील. कृषि उपसंचालक यांनी नमुना कोड नोंदवही त्यांचे स्वत:चे ताब्यात ठेवावी. परीशिष्ठ ८ मध्ये सर्व माहिती भरुन त्याची प्रत चमुतील सर्व सभासदांना देण्यात यावी. नमुना कोड क्रमांक चमुतील इतर सदस्यांना ज्ञात होणार नाही याबाबत व्यक्तिश: दक्षता घ्यावी.

२० राज्य स्तरावरील तपासणी पथकाने काढलेल्या नमुन्याची नोंदवही कृषि उपसंचालक (फलो-४) ,कृषि आयुक्तालय यांचे स्तरावर ठेवण्यात यावी.

२१ नमुना तपसाणीचे निष्कर्ष प्रयोगशाळेकडुन प्राप्त झालेनंतर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उपसंचालक यांनी दिलेले कोड डीकोड करुन अप्रमाणित झालेल्या नमुन्याची सविस्तर माहिती जिल्हा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे स्वाक्षरीने विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय व कृषि आयुक्तालयास सादर करावे.

**१५. योजनेचे मुल्यमापन** - सन २०२०-२१ अंतर्गत सद्यस्थितीत संनियंत्रण व मुल्यमापन कक्ष ,कृषि आयुक्तालय स्तरावरुन देण्यात आलेल्या सुचनेनुसार कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजनांचे आधारे विभागिय कृषि सहसंचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मुल्यांकन करण्यात येणार आहे. Result Frame work documents (RFD) याकरीता संनियंत्रण व मुल्यमापन कक्ष , कृषि आयुक्तालय स्तरावरुन Google spreadsheet तयार करण्यात आले असुन फलोत्पादन योजनेतील प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना प्रती थेंब अधिक पीक योजनेकरीता गुण देण्यात आले असुन प्रत्येक महीना अखेरचे साध्य पुढील १५ तारखेपर्यंत भरावयाचे आहे. यामध्ये महिनाअखेर किती क्षेत्रावर संच बसविले या बाबतची आकडेवारी भौतिक साध्यामध्ये हेक्टरमध्ये भरावयाची असुन महिनाअखेर झालेला खर्च साध्यामध्ये लाखात भरावयाचा आहे.

केंद्र शासनास सादर करण्यात आलेला वार्षीक कृती आराखडयानुसार सन २०२०-२१ करीता भौतिक (हे) आणि आर्थिक (लाख) लक्षांक कृषि आयुक्तालय स्तरावरुन भरण्यात आलेले आहे. जिल्हानिहाय वार्षिक कृती आराखडा अधिक माहितीसाठी सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे. ( परीशिष्ठ १ )

**१६. पुरक अनुदान** - बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत आणि क्षेत्राबाहेरील) योजनेंतर्गत अनुसुचित जमाती या प्रवर्गातील तसेच डा. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेंतर्गत अनुसुचित जाती या प्रवर्गातील निवड झालेल्या सर्व लाभार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत देण्यात येणा-या

अनुदानास पुरक अनुदान देऊन आदिवासी शेतक-यांना एकुण खर्चाच्या ९० टक्के च्या मर्यादेत अनुदान देण्यात येईल. याबाबतच्या सविस्तर सुचना या कार्यालयाचे परीपत्रक क्रमांक /कृआ/फलो-४/ बिमु/ डा.बा.आकृस्वायो/ सुसि/५१/३०९२/२० दि.२२/०१/२०२१ नुसार स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. परीपत्रकातील सुचनमांप्रमाणे कार्यवाही करुन सर्व लाभार्थीना लाभ देऊन दिलेले लक्षांक साध्य करावे.

## १७. प्रशासकीय /आकस्मिक खर्च व निधी उपयोगिता प्रमाणपत्र

१. सुक्ष्म सिंचन योजेंतर्गत प्रशासकीय खर्चासाठी राखून ठेवण्यात आलेल्या निधीचे वितरण विभागीय कृषि सहसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी आणि तालुका कृषि अधिकारी यांना आयुक्तालय स्तरावरुन निश्चित करण्यात येईल. निश्चित केलेल्या निधीचे वितरण जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयास करण्यात येईल. त्याप्रमाणे जिल्हा स्तरावरुन संबंधीतांची देयके अदायगी करावीत.

२. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आकस्मिक निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी विभागीय कृषि सहसंचालक यांचे प्रतिस्वाक्षरीसह आयुक्तालयास सादर करावे. केंद्र शासनास सादर करण्यात येणारे आंग्लभाषिय उपयोगिता प्रमाणपत्र जीएफआर १९-अे नूसार सादर करण्यात यावे.

३. उपलब्ध करुन दिलेला निधी तात्काळ खर्च करावा व त्याप्रमाणे उपयोगीता प्रमाणपत्र विहीत अहवालासह सादर करावे. हे उपयोगिता प्रमाणपत्र सादर झाल्याशिवाय पुढील निधी वितरीत केला जाणार नाही. हे प्रमाणपत्र देताना मासिक खर्चाचे विवरणपत्राशी पडताळून पहाण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक यांची राहील.यामध्ये तफावत राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

## १८. लेखा परिक्षीत उपयोगिता प्रमाणपत्र -

१. सन २०२०-२१ पासुन योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीचे लेखा परिक्षीत उपयोगिता प्रमाणपत्र कृषि आयुक्तालय स्तरावरुन केंद्र शासनास सादर करणेत येईल.

२. याकरीता योजनेतील जमा-खर्चाचे सविस्तर लेखा परिक्षण करण्यासाठी आवश्यक ते अभिलेख वेळोवेळी संचालक फलोत्पादन यांचे स्तरावरुन अद्ययावत करणेत येईल.

३. सन २०२०-२१ करीता लेखांकन व लेखापरीक्षण करण्यासाठी स्वतंत्र सनदी लेखापालाची नियुक्ती कृषि आयुक्तालय स्तरावरुन करणेत येईल.

सदरच्या सुचना केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार निर्गमीत करण्यात येत असून योजनेची अंमबजावणी करतांना अडचणी निर्माण झाल्यास केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना अंतीम समजण्यात याव्यात. उपरोक्त सुचना केंद्र शासन, राज्य शासन निर्णयांच्या व वेळोवेळी दिलेल्या पत्राच्या अधीन राहुन निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये काही शंका, अडचणी व इतर काही मुद्दे उपस्थित झाल्यास मुळ शासन निर्णय,पत्र,सुचना इ.अंतिम राहतील त्यानुसार कार्यवाही करावी.

**सोबत :** वरील प्रमाणे

**संचालक,फलोत्पादन**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-५**

१) मा. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग मंत्रालय,मुबई-३२ यांना माहितीस्तव सादर.
२) संचालक (सर्व) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
३) विभागीय कृषि सहसंचालक (सर्व) यांना माहितीस्तव व पुढील योग्य कार्यवाहीस्तव
४) कृषि सहसंचालक (सर्व) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
५) कृषि सहसंचालक (आस्थापना) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
६) अधिक्षक कृषि अधिकारी (दक्षता पथक) कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

पारारोव्ह ?

67

Annexure-II

Annual Action Plan for Per Drop More Crop (Micro Irrigation)component of

Name of the State : Maharashtra (Rs.Lakhs, Area-Ha.)

| Sr.No. | District | Physical Targets (Area in Ha) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Drip | | | Sprinkler | | | Total |
| | | Agri | Horti | Total | Agri | Horti | Total | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | Thane | 35 | 15 | 50 | 0 | 0 | 0 | 50 |
| 2 | Palghar | 66 | 28 | 94 | 5 | 2 | 8 | 102 |
| 3 | Raigad | 23 | 10 | 32 | 0 | 0 | 0 | 32 |
| 4 | Ratnagiri | 55 | 24 | 79 | 1 | 0 | 1 | 80 |
| 5 | Sindhudurg | 28 | 12 | 40 | 1 | 1 | 2 | 42 |
| | **Div. Total** | **207** | **89** | **296** | **8** | **3** | **11** | **306** |
| 6 | Nashik | 3669 | 1573 | 5242 | 485 | 208 | 692 | 5935 |
| 7 | Dhule | 3195 | 1369 | 4564 | 58 | 25 | 83 | 4648 |
| 8 | Nandurbar | 818 | 350 | 1168 | 12 | 5 | 17 | 1185 |
| 9 | Jalgaon | 9763 | 4184 | 13946 | 171 | 73 | 244 | 14191 |
| | **Div. Total** | **17445** | **7476** | **24921** | **726** | **311** | **1037** | **25958** |
| 10 | Ahmednagar | 4745 | 2034 | 6779 | 1125 | 482 | 1608 | 8386 |
| 11 | Pune | 2382 | 1021 | 3403 | 214 | 92 | 306 | 3709 |
| 12 | Solapur | 3885 | 1665 | 5550 | 340 | 146 | 486 | 6035 |
| | **Div. Total** | **11012** | **4719** | **15731** | **1679** | **720** | **2399** | **18130** |
| 13 | Sangli | 3518 | 1508 | 5025 | 132 | 57 | 189 | 5214 |
| 14 | Satara | 1556 | 667 | 2222 | 156 | 67 | 223 | 2445 |
| 15 | Kolhapur | 996 | 427 | 1423 | 14 | 6 | 20 | 1443 |
| | **Div. Total** | **6070** | **2601** | **8671** | **302** | **130** | **432** | **9103** |
| 16 | Aurangabad | 6098 | 2614 | 8712 | 1119 | 479 | 1598 | 10310 |
| 17 | Jalna | 5606 | 2402 | 8008 | 2619 | 1123 | 3742 | 11750 |
| 18 | Beed | 3094 | 1326 | 4420 | 2189 | 938 | 3127 | 7548 |
| | **Div. Total** | **14798** | **6342** | **21140** | **5927** | **2540** | **8467** | **29608** |
| 19 | Latur | 1717 | 736 | 2452 | 3878 | 1662 | 5540 | 7993 |
| 20 | Osmanabad | 2180 | 934 | 3114 | 2781 | 1192 | 3972 | 7086 |
| 21 | Nanded | 1946 | 834 | 2780 | 1375 | 589 | 1964 | 4744 |
| 22 | Parbhani | 1592 | 682 | 2274 | 1372 | 588 | 1960 | 4234 |
| 23 | Hingoli | 858 | 368 | 1226 | 1769 | 758 | 2527 | 3753 |
| | **Div. Total** | **8293** | **3554** | **11846** | **11174** | **4789** | **15962** | **27809** |
| 24 | Amravati | 2815 | 1207 | 4022 | 3924 | 1682 | 5606 | 9628 |
| 25 | Buldhana | 3704 | 1587 | 5291 | 4120 | 1766 | 5885 | 11177 |
| 26 | Akola | 1228 | 526 | 1754 | 2791 | 1196 | 3987 | 5742 |
| 27 | Washim | 737 | 316 | 1052 | 2351 | 1008 | 3358 | 4411 |
| 28 | Yavatmal | 931 | 399 | 1330 | 3499 | 1500 | 4999 | 6328 |
| | **Div. Total** | **9414** | **4035** | **13449** | **16685** | **7151** | **23836** | **37285** |
| 29 | Nagpur | 1009 | 432 | 1441 | 907 | 389 | 1296 | 2737 |
| 30 | Wardha | 737 | 316 | 1052 | 1613 | 691 | 2305 | 3357 |
| 31 | Bhandara | 49 | 21 | 70 | 25 | 11 | 36 | 106 |
| 32 | Gondia | 102 | 44 | 146 | 5 | 2 | 8 | 154 |
| 33 | Chandrapur | 97 | 41 | 138 | 761 | 326 | 1087 | 1225 |
| 34 | Gadchiroli | 6 | 2 | 8 | 4 | 2 | 5 | 13 |
| | **Div. Total** | **1999** | **857** | **2855** | **3316** | **1421** | **4737** | **7592** |
| | Total M.S. | **69237** | **29673** | **98910** | **39817** | **17064** | **56881** | **155791** |

परिशिष्ट-9



Annexure-II

# Annual Action Plan for Per Drop More Crop (Micro Irrigation)component of

Name of the State : Maharashtra (Rs.Lakhs, Area-Ha.)

| Sr.No. | District | Physical Targets (No of farmers) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Drip | | | Sprinkler | | | Total |
| | | Agri | Horti | Total | Agri | Horti | Total | |
| 1 | 2 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 1 | Thane | 39 | 17 | 55 | 0 | 0 | 0 | 55 |
| 2 | Palghar | 72 | 31 | 104 | 6 | 3 | 9 | 112 |
| 3 | Raigad | 25 | 11 | 36 | 0 | 0 | 0 | 36 |
